साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South!
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगीन्ज टॉप, बरमुडा...
थर्मल, जर्किन स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०७.०७.२०२६ | अंक नं. ०८३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी
खरेदीवर पॉइंट
पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

रु. 2000 पासुन बेबी टॉप्स / 1000 पेक्षाही अधिक डिझाईन्स
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ ९९९/-*
Conditions Apply*

# अकोल्यात जोरदार तर अहिल्यानगर जिल्ह्यात रिमझिम पाऊस

## अकोल्यात सर्वाधिक ६१.५ मिमी, तर जिल्हाभरात सरासरी २६.८ मिमी पावसाची नोंद

नगर - गेल्या २४ तासात जिल्ह्यात ७ जुलै रोजी सकाळी १० वाजेपर्यंत सरासरी २६.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये अकोले तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली असून, काही तालुक्यांमध्ये मध्यम पाऊस तर काही ठिकाणी दमदार पाऊस झाला.

पश्चिम घाटमाथ्यावर मागील पाच दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे पर्जन्यछायेत असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यात संततधार सुरु होती. ६ जुलै रोजी पावसाचा जोर काहीसा वाढला होता. त्यामुळे जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यात मध्यम ते दमदार स्वरुपाचा पाऊस झाला. अकोले तालुक्यातील धरण पाणलोटात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे छोटी धरणे, तलाव भरले. भंडारदरा, निळवंडे धरणातील पाणीसाठाही वाढला आहे.

अकोले तालुक्यात ६ जुलै रोजी सर्वाधिक ६१.५ मिमी इतका पाऊस झाला. त्यापाठोपाठ राहता तालुक्यात ४२.५ मिमी आणि श्रीगोंदा तालुक्यात ४०.५ मिमी पावसाची नोंद झाली असून या भागातील शेतकरी सुखावला आहे. कर्जत (३९.४ मिमी) आणि पारनेर (३४.३ मिमी) तालुक्यांतही पावसाचा जोर चांगला होता. दुसरीकडे, राहुरी तालुक्यात सर्वात कमी म्हणजे अवघा ५.८ मिमी पाऊस झाला असून, पाथर्डी (९.० मिमी) आणि शेवगाव (१०.९ मिमी) या तालुक्यांमध्ये केवळ रिमझिम किंवा हलक्या स्वरूपाच्या सरी बरसल्या. एकाच दिवसात जिल्ह्यात सरासरी २६.८ मिमी पाऊस झाल्याने पावसाच्या प्रोग्रेसिव्ह नोंदीत वाढ होऊन जिल्ह्यातील एकूण पाऊस ५० मिमीवर पोहोचला आहे.

दरम्यान ७ जुलै रोजी जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागाने वर्तविला आहे. त्यामुळे प्रशासनाने आपतकालीन परिस्थितीत नागरिकांसाठी १०७७ हा हेल्पलाईन संपर्क क्रमांक जाहीर केला आहे. तसेच पश्चिम घाट माथ्यावर झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्यांना पूर आलेला आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि विनाकारण पाण्यात उतरणे टाळावे.

### धरणांतील पाणीसाठ्यात वाढ

अकोले तालुक्यात गेले पाच दिवस पाऊस होत असल्याने धरणांतील पाणी पातळीही वाढत आहे. अकोले तालुक्यातील बहुतांश छोटे तलाव ओसंडून वाहू लागले आहेत. ५ जुलै रोजी भंडारदरा धरणात ४०० द.ल.घ.फू. तर ६ जुलै रोजी दिवसभरात ६६३ द.ल.घ.फू. असे दोन दिवसात १ हजार ६३ द.ल.घ.फू. पाणीसाठा वाढला आहे. ६ जुलै रोजी वाकी तलाव पूर्ण क्षमतेने भरला असून, त्यातून निळवंडे धरणाकडे ७५० क्युसेकने पाणी वाहत आहे. त्यामुळे निळवंडे धरणाचा पाणीसाठाही झपाट्याने वाढत आहे. मुळा धरणाच्या पाणलोटातही चांगला पाऊस पडत आहे. ७ जुलै रोजी कोतूळ बंधाऱ्यावरुन मुळा धरणाकडे २९ हजार क्युसेकने पाणी वाहत आहे. त्यामुळे मुळा धरणातील पाणीसाठ्यातही चांगली वाढ होत आहे.

| तालुकावार २४ तासांतील पाऊस (मिमीमध्ये) | |
|---|---|
| अकोला | ६१.५ |
| राहता | ४२.५ |
| श्रीगोंदा | ४०.५ |
| कर्जत | ३९.४ |
| पारनेर | ३४.३ |
| कोपरगाव | ३१.९ |
| जामखेड | २१.० |
| श्रीरामपूर | २१.० |
| अहिल्यानगर | २०.९ |
| संगमनेर | २०.१ |
| नेवासा | १३.६ |
| शेवगाव | १०.९ |
| पाथर्डी | ९.० |
| राहुरी | ५.८ |

### मागील वर्षीच्या तुलनेत ४० मिमी पाऊस कमीच

मागील वर्षी ७ जुलैपर्यंत जिल्ह्यात जिल्ह्यात सरासरी ९० मिमी पाऊस पडला होता. यंदा मात्र, केवळ ५० मिमी पाऊस झाला आहे. गेल्या वर्षी मे महिन्याच्या अखेरीस जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला होता. हा पाऊस पेरणीयोग्य असल्यामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यातच शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या होत्या. यंदा मात्र, मे महिन्यात पाऊस झाला नाही. जूनमध्येही किरकोळ पाऊस झाला. त्यामुळे या वर्षी सुरुवातीपासून जिल्ह्यात पाऊसमान सरासरीपेक्षा कमीच राहिले. त्यामुळे यंदा पेरण्या रखडल्याचे चित्र आहे.

### भीमा नदीला महापूर.. आर्वी बेटाला पुराचा वेढा

पुणे जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे भीमा नदीला महापूर आलेला आहे. ७ जुलै रोजी दुपारी १२ वाजेच्या आकडेवारीनुसार, भीमा नदीवरील दौंड पूल येथे बसवण्यात आलेल्या सेन्सरनुसार नदीतून तब्बल १ लाख ६१ हजार ८४८ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या महापुराने श्रीगोंदा तालुक्यातील आर्वी बेटाला वेढा पडला आहे. प्रशासनाने आपत्तकालीन परिस्थितीत नागरिकांसाठी बोट उपलब्ध करुन दिलेली आहे. गोदावरी खोऱ्यातही पाण्याची आवक सुरू असून नांदूर मधमेश्वर धरणातून ७,९२४ क्युसेक वेगाने गोदावरी नदीपात्रात विसर्ग सोडण्यात आला आहे.

### श्रीगोंद्यातील दोन प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद

श्रीगोंदा तालुक्यात झालेल्या जोरदार पावसामुळे स्थानिक नद्यांना व भीमा नदीला आलेल्या पुरामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने तालुक्यातील दोन रस्ते बंद करण्यात आले आहेत. सरस्वती नदीवरील पर्यायी मार्ग पाण्याखाली गेल्यामुळे पेडगाव ते शेडगाव मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे निमगाव खलू - कौठा - अजनुज - पेडगाव - शेडगाव हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्याऐवजी शेडगाव-टाकळी कडेवळीत-श्रीगोंदा-पेडगाव असा पर्यायी मार्ग प्रवासासाठी वापरता येईल. भीमा नदीचा आर्वी बेटाला वेढा पडला असून, आर्वी-अजनुज मार्ग बंद करण्यात आला आहे. आर्वी पुनर्वसन येथील पाईप मोरीवरुन पाणी वाहत असल्यामुळे पुनर्वसन ते अजनुज मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. दरम्यान आर्वी-अनगरे-कौठा मार्गे अजनुज असा पर्यायी मार्ग उपलब्ध असल्याचे प्रशासनाने कळविले आहे.

### नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

भारतीय हवामान विभागाने जिल्ह्यासाठी मुसळधार पाऊस व ढगफुटीची शक्यता वर्तवत 'रेड अलर्ट' जारी केल्याच्या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या गावांतील वस्तीतील नागरिकांनी सतर्क राहावे, असा इशारा अहिल्यानगर पाटबंधारे विभागाने दिला आहे. धरणातील पाणीसाठा व नदीपात्रातील पाण्याची आवक लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन कार्यकारी अभियंता स्वप्नील काळे यांनी केले आहे. सध्या धरण पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस सुरू असून धरणांमध्ये पूर्ण क्षमतेने पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे नदीपात्रातील पाण्याच्या प्रवाहात वाढ होण्याची शक्यता लक्षात घेण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर धरणस्थळांच्या खालील प्रवरा नदीकाठच्या गावांतील वस्तीतील नागरिकांनी सतर्क राहून प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.

### अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे अकोले तालुक्यातील शाळांना सुट्टी

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील सर्व अंगणवाड्या, प्राथमिक व माध्यमिक शाळांना ७ जुलै रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. सुट्टीच्या कालावधीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी नेहमीच्या कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनासंबंधीचे कामकाज करावे, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# 'युपीआय'द्वारे बँक खात्यातून १० लाख रुपयांची केली चोरी

नगर - युपीआय तंत्रज्ञानाद्वारे तरुणाच्या विविध बँक खात्यांतून १० लाख २ हजार ७७९ रुपये चोरल्याची घटना ४ जुलै रोजी रात्री साडेसात ते आठ वाजेच्या सुमारास घडली. या प्रकरणी श्रीराम संजय बांगर यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी श्रीराम बांगर हे पाथर्डी तालुक्यातील लोहसर येथील रहिवासी असून ते एका खाजगी कंपनीत नोकरी करतात. अज्ञात आरोपीने फिर्यादी यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या मोबाईल क्रमांकाशी जोडलेल्या तीन वेगवेगळ्या बँकांच्या खात्यांमधून पैसे काढून घेतले. यामध्ये आयसीआयसीआय बँक, कोटक महिंद्रा बँक आणि सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या बचत खात्यांचा समावेश आहे.

चोराने युपीआय तंत्रज्ञानाचा गैरवापर करून अवघ्या काही मिनिटांत ही सर्व रक्कम स्वतःच्या खात्यावर वळवून घेतली. खात्यातून पैसे वजा झाल्याचे संदेश मोबाईलवर आल्यानंतर फिर्यादी यांना आपली फसवणूक झाल्याचे समजले. श्रीराम बांगर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सायबर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस या तपास करत आहेत.

डॉ.अद्वैत गिते MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज * तोल जाणे
* व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवारू, पॅरेलीसीस * थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध. * सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटी शेजारी, अहिल्यानगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

द्वितीय पुण्यस्मरण

स्व. साहिल अशोक पोपटानी
(स्व.०७/०७/२०२४)
रो पड़ती है आँखे हमारी देखके तस्वीर आपकि,
जिंदगी ऐसी जी गए कि मौत भी शर्मा गई ।
जिंदगी जी छोटी लेकिन सबसे अच्छी जी गए,
हर जगह सुगंध फैलाकर स्मृति सबके दिलमें रख गए।
- शोकाकूल -
समस्त पोपटानी परिवार तथा रिश्तेदार
फर्म : मेहरूमल सभागामल किराणा मर्चंट
दाळमंडई, अ.नगर, मो : 9890062002

४थे पुण्यस्मरण

वात्सल्याची खाण तू
प्रेमाची मूर्ती तू
आमच्या या जगण्याची
जणू आहेस स्फूर्ती तू...
सदैव तुझ्या आठवणीत...
आपल्या पावन स्मृतीस आम्हा सर्वांची
भावपूर्ण श्रद्धांजली !
स्वर्ग. सौ. छाया नंदकिशोर खंडेलवाल
स्वर्गवास दि. ०७ जुलै २०२२
रामकिशोर • दीपक • कल्पेश • ख्याति • विक्की
पल्लवी • महेश • निशि • दीपमाला • आशा
मधुबाला • दिवीशा • व्दिती • ऋत्विक • रामेश्वर थोरात
खंडेलवाल परिवार
जयपुर टेस्ट, गंजबाजार, अ.नगर
9822574246, 9309709813
Asha

१३ वे पुण्यस्मरण

स्व.राजेंद्र भास्करराव वालकर
स्व.दि. ०७ जुलै २०१३
आपल्या संस्काररूपी स्मृतींचा..
स्मृतीगंध आजही दरवळत आहे..
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच
आम्हांला प्रेरणा देत आहे..
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली..
- दुःखांकित -
आर. बी. वालकर
वालकर, कायगांवकर,
वाफगांवकर, देवळालीकर परिवार
अहमदनगर, राजगुरुनगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# ओला व सुका कचरा वेगवेगळा संकलित करावा : नगरसेविका सुजाताताई पडोळे यांची मागणी

नगर - अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील घनकचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्यांद्वारे ओला आणि सुका कचरा एकत्रितच गोळा केला जात असल्याचा प्रकार समोर आला असून, हा कचरा नियमानुसार वेगवेगळा संकलित करण्यात यावा, अशी मागणी नगरसेविका सौ. सुजाताताई महेंद्र पडोळे यांनी मनपा उपायुक्तांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

प्रभागातील विविध भागात दैनंदिन पातळीवर मोठ्या प्रमाणावर कचरा गोळा केला जातो. मात्र, कचरा संकलन करणारी घंटागाडी ओला व सुका कचरा वेगवेगळा न घेता एकत्रितच संकलित करत असल्याने कचरा वर्गीकरणाच्या नियमांचे उल्लंघन होत असून प्रशासनाने यावर तात्काळ लक्ष देणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या निवेदनात नगरसेविका सुजाताताई पडोळे यांनी कचरा प्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित केले आहेत. घंटागाडीने संकलित केलेला कचरा ज्या ठिकाणी डम्प केला जातो, तिथे या कचऱ्याची कशा प्रकारे विल्हेवाट लावली जाते किंवा ओल्या व सुक्या कचऱ्याचे कसे व्यवस्थापन केले जाते, याची संपूर्ण माहिती प्रशासनाने उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. यासोबतच कचरा संकलनाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा विचार करता त्यांना चांगल्या प्रतीचे मास्क, हातमोजे, टोपी आणि बूट इत्यादी आवश्यक सुरक्षा साहित्य मनपाकडून उपलब्ध करून देण्यात यावे, जेणेकरून कर्मचाऱ्यांचे आरोग्य सुरक्षित राहील, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. यापुढे प्रभाग १३ मध्ये ओला व सुका कचरा सक्तीने वेगवेगळा संकलित करण्याबाबत प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली असून या निवेदनाच्या प्रती महापौर कार्यालय आणि संबंधित प्रभाग कार्यालयालाही योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात आल्या आहेत.

# अहिल्यानगरात वीज वितरण कंपनी आणि मनपाच्या निष्काळजी कारभारामुळे नागरिकांचे जीव धोक्यात

## आणखी किती बळी घेणार? : काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण



नगर - अहिल्यानगर शहरात विजेच्या धक्क्यामुळे होणाऱ्या मृत्यूच्या घटना वारंवार घडत असूनही महावितरण कंपनी आणि अहिल्यानगर महानगरपालिका अद्यापही गंभीरपणे दखल घेत नसल्याची टीका काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी केली आहे. संबंधित विभागांच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला असून तातडीने व्यापक सुरक्षा उपाययोजना न केल्यास काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

अहिल्यानगरमध्ये नुकतीच विजेच्या धक्क्याने अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण शहर हळहळले. यापूर्वी ३१ ऑगस्ट २०२१ रोजी 'मिस्टर एशिया' विजेता आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे बॉडीबिल्डर अजिंक्य सुरेश गायकवाड यांचा घरातील टीव्हीच्या वायरिंगमधून आलेल्या विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला होता. त्यानंतर सावेडी येथील प्रोफेसर कॉलनी चौकात जाहिरातीचा फ्लेक्स लावत असताना विद्युत तारांच्या संपर्कात आल्याने सौरभ चौरे या तरुणालाही आपला जीव गमवावा लागला. या तीनही घटना केवळ अपघात नसून संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणाचे जिवंत उदाहरण असल्याचे दीप चव्हाण यांनी म्हटले आहे.

अहिल्यानगर शहरात महावितरणचे हजारो वीज खांब, ट्रान्सफॉर्मर (डीपी), पथदिवे आणि विद्युत यंत्रणा अस्तित्वात आहेत. मात्र अनेक ठिकाणी डीपी उघड्या अवस्थेत असून त्यांचे दरवाजे, फ्यूज बॉक्स आणि सुरक्षा कवच गायब आहेत. विजेच्या तारा रस्त्यावर लोंबकळत आहेत. अनेक खांबांवर मोठ्या प्रमाणात वेलींचे जाळे पसरले असून झाडांच्या फांद्या थेट विद्युत तारांना चिकटलेल्या आहेत. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी छाटणी आणि साफसफाईच्या नावाखाली लाखो रुपयांचा खर्च केला जातो; मात्र प्रत्यक्षात परिस्थिती जैसे थे असल्याचा आरोप त्यांनी केला.

पावसाळ्यात वेली आणि झाडांच्या ओल्या फांद्यांमधून विद्युत प्रवाह जमिनीपर्यंत पोहोचण्याची शक्यता वाढते. अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचलेले असते. अशा वेळी एखाद्या खांबामध्ये किंवा डीपीमध्ये विद्युत गळती झाल्यास पादचारी, दुचाकीस्वार, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांचा जीव धोक्यात येऊ शकतो. शाळकरी मुले रस्त्यावरून ये-जा करतात, पावसाच्या पाण्यात खेळतात. त्यांच्यासाठी ही परिस्थिती अत्यंत धोकादायक आहे.

याशिवाय शहरातील अनेक केबल टीव्ही आणि फायबर इंटरनेट सेवा देणाऱ्या कंपन्यांनी महावितरणच्या वीज खांबांवर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीरपणे केबल टाकल्या आहेत. पावसाळ्यात या केबल ओल्या झाल्यास विद्युत प्रवाह त्यामधून घराघरांत पोहोचण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे टीव्ही, इंटरनेट राऊटर, वायरिंग आणि स्विच बोर्डपर्यंत करंट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे महावितरण आणि महानगरपालिका दोघांचेही दुर्लक्ष असल्याचा आरोप दीप चव्हाण यांनी केला.

नागरिकांचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? आणखी किती निष्पाप नागरिकांचा बळी गेल्यानंतर अधिकारी जबाबदारी स्वीकारणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

दीप चव्हाण यांनी महावितरण आणि महानगरपालिकेकडे शहरातील सर्व पथदिवे वीज खांब, डीपी, विद्युत तारा, पथदिवे, बेकायदेशीर केबल आणि धोकादायक ठिकाणांचे संयुक्त सुरक्षा ऑडिट करून तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. अन्यथा काँग्रेस पक्ष नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन उभारेल, असा इशाराही त्यांनी दिला.

# खासदार निलेश लंके यांचा ८ जुलैला नगरमध्ये महावितरणविरोधात मोर्चा



नगर - नगर - जिल्ह्यातील जनतेच्या प्रलंबित वीज प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी ८ जुलै रोजी खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असून, बसस्थानक चौकापासून ते महावितरण कार्यालयापर्यंत पायी मोर्चा काढण्यात येणार आहे. वीज कपात, वाढीव बिले आणि शेतकऱ्यांच्या वीज जोडणीच्या विविध समस्यांबाबत महावितरणला जाब विचारण्यासाठी हे आंदोलन करण्यात येत आहे, असे खासदार लंके यांच्या कार्यालयाकडून कळविण्यात आले.

खासदार लंके यांच्या शहरातील चौणक्य चौक येथील संपर्क कार्यालयापासून या मोर्चाला सुरुवात होणार आहे. तेथून मोर्चा सुरु झाल्यानंतर सर्व आंदोलक पायी चालत माळीवाडा बसस्थानक चौकातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास अभिवादन करतील. अभिवादन कार्यक्रम संपल्यानंतर तेथून हा मोर्चा तेथून महावितरण कार्यालयाकडे घोषणा देत पायी मार्गक्रमण करणार आहे. सकाळी ११ वाजता महावितरण कार्यालयावर पोहोचल्यावर तेथे जोरदार आंदोलन करण्यात येईल व अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात येईल. तसेच विविध मागण्यांचे निवेदन अधिकाऱ्यांना सादर करण्यात येईल.

महावितरणच्या कथित निष्काळजी व जनविरोधी कारभारामुळे नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी ८ जुलै रोजी अहिल्यानगर येथील महावितरण कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन करण्याची घोषणा केली आहे.

मतदारसंघातील ज्या नागरिकांना, शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना विजेचा त्रास सहन करावा लागत आहे, त्यांनी आपल्या हक्कांसाठी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

यासंदर्भात महावितरणचे अधीक्षक अभियंता यांना निवेदन देऊन लंके यांनी आंदोलनापूर्वीच सर्व प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याची मागणी केली आहे. अन्यथा उद्भवणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

मतदारसंघातील अनेक भागांत सुरू असलेले अघोषित व अनियमित लोडशेडिंग, जळालेले ट्रान्सफॉर्मर (डीपी) वेळेत न बदलणे, स्मार्ट मीटरमुळे वाढीव व चुकीची वीजबिले, अतिवृष्टी व वादळामुळे नुकसान झालेल्या वीज यंत्रणेची रखडलेली दुरुस्ती, सौरऊर्जा व नेट मीटरिंग प्रकरणांतील विलंब, तक्रार निवारण यंत्रणेचे अपयश, कृषी वीजजोडणीतील विलंब आणि देखभालीच्या अभावामुळे निर्माण होणारे वारंवार तांत्रिक बिघाड या प्रमुख प्रश्नांकडे त्यांनी निवेदनातून लक्ष वेधले आहे.

सौरऊर्जा योजनेसाठी पैसे भरूनही अनेक शेतकऱ्यांना एक ते दोन वर्षे सोलर पॅनेल बसवून मिळत नसल्याचा तसेच काही एजन्सीकडून अतिरिक्त रकमेची मागणी होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

आंदोलनाद्वारे अघोषित लोडशेडिंग तातडीने बंद करणे, जळालेल्या डीपी कालबद्ध पद्धतीने बदलणे, स्मार्ट मीटर व वाढीव वीजबिलांची उच्चस्तरीय चौकशी करणे, स्मार्ट मीटर सक्तीचे न ठेवणे, अतिवृष्टीग्रस्त वीज पायाभूत सुविधांची त्वरित दुरुस्ती, सोलर व नेट मीटरिंगची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढणे, तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करून निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आणि कृषी वीजजोडणीची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करणे, या प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत.

स्थानिक पातळीवर वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसल्याने जनतेच्या संयमाचा अंत झाला आहे. त्यामुळे शेतकरी, ग्रामस्थ आणि नागरिकांसमवेत ८ जुलै रोजी लोकशाही मार्गाने जनआंदोलन करण्यात येणार आहे, असे खासदार नीलेश लंके यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# विजेचा शॉक लागून मुलीच्या मृत्यूप्रकरणी ठेकेदार, अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

नगर - शहरातील आनंदनगर भागात महावितरणच्या हलगर्जीपणामुळे विजेच्या खांबाला स्पर्श झाल्याने तीव्र शॉक लागून साडेतीन वर्षांच्या एका निष्पाप चिमुरडीचा मृत्यू झाल्याची घटना ६ जुलै रोजी घडली होती. याप्रकरणी महावितरणचे सहाय्यक अभियंता यांच्यासह दोन अधिकारी व एक ठेकेदार अशा चार जणांवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रिती किरण गांगुर्डे (वय साडेतीन वर्षे, रा. आनंदनगर, अहिल्यानगर) असे मृत पावलेल्या चिमुरडीचे नाव आहे. ६ जुलै रोजी दुपारी १२:१५ वाजण्याच्या सुमारास प्रिती ही घराबाहेर खेळत होती. खेळत असताना तिथे असलेल्या महावितरण विभागाच्या एका विजेच्या खांबाला तिचा हात लागला. या खांबामध्ये वीजप्रवाह उतरलेला असल्याने तिला जोरदार विजेचा झटका (शॉक) बसला आणि त्यातच तिचा जागीच मृत्यू झाला.

या दुर्घटनेनंतर महावितरणच्या कारभाराविरुद्ध आ. संग्राम जगताप यांच्या राष्ट्रवादी, भाजप पदाधिकाऱ्यांनी महावितरण कार्यालयात ठिय्या मांडून आंदोलन केले होते. तसेच नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत होता. यातील दोषींवर गुन्हा दाखल झाल्याशिवाय येथून उठणार नाही, अशी भूमिका आ. जगताप यांनी घेतली होती. अखेरीस महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता भास्कर कोळे यांनी या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. विद्युत खांबाची योग्य काळजी न घेता कर्तव्यात कसूर करून या चिमुरडीच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याबद्दल पोलिसांनी झगडे (विद्युत ठेकेदार, मे. तनिष्का), महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ शरद काकडे, विद्युत सहाय्यक स्वप्नील ईश्वरकर, सहाय्यक अभियंता विनोद पांढरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

गुन्हा दाखल होताच नगर शहर विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस आणि पोलीस उपनिरीक्षक अमिना शेख यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली आहे. कोतवाली पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समाधान सोळंके पुढील तपास करत आहेत.

# मुलाने आणि सुनेनेच फोडले वडिलांच्या घराचे कुलूप; सोन्याची अंगठी आणि रोकड लंपास

नगर - घरातील अंतर्गत वादातून मुलाने आणि सुनेनेच स्वतःच्या वडिलांच्या घराचे कुलूप तोडून घरातील ऐवज चोरून नेल्याची घटना अहिल्यानगरमध्ये उघडकीस आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

जेऊर बायजाबाई येथील रहिवासी लक्ष्मण जयवंत बनकर (वय ५५, व्यवसाय-शेती) यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. लक्ष्मण बनकर हे घराबाहेर गेलेले असताना, त्यांचा मुलगा प्रशांत लक्ष्मण बनकर आणि सून चित्रा प्रशांत बनकर या दोघांनी मिळून ही चोरी केली. दोघांनी लक्ष्मण यांच्या संमतीशिवाय राहत्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडले आणि घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटाचे लॉकर उघडून त्यात ठेवलेले १५ हजार रुपये रोख आणि ३० हजार रुपये किमतीची अर्धा तोळा वजनाची सोन्याची अंगठी, असा एकूण ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल कायदेशीर परवानगीशिवाय आणि लबाडीच्या इराद्याने चोरून नेला. हा प्रकार ५ जुलै रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास घडला. या घटनेनंतर घाबरलेल्या वडिलांनी तातडीने पोलिसांत धाव घेतली. लक्ष्मण बनकर यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिसांनी मुलगा प्रशांत बनकर आणि सून चित्रा बनकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक थोरात आणि पोलीस हेडकॉन्स्टेबल रोहकले यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल रोहकले करत आहेत.

# अहिल्यानगर जिल्ह्यात बेकायदेशिर ऑनलाईन जुगार; कठोर कारवाई करण्यासाठी थेट मुख्यमंत्र्यांकडे मागणी

## क्रिकेट बेटिंग, ऑनलाइन रमी, कॅसिनो ॲप्सच्या वाढत्या विळख्यावर चिंता; गृहमंत्री व पोलीस महासंचालकांकडे निवेदन

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या बेकायदेशीर ऑनलाइन जुगाराच्या (क्रिकेट बेटिंग, बिंगो, रमी, कॅसिनो आणि तत्सम जुगार ॲप्स) वाढत्या जाळ्यावर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणीचे निवेदन अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पोलीस महासंचालक यांना पाठविण्यात आले आहे. जिल्ह्यात सुरू असलेल्या या अवैध व्यवसायामुळे युवकांचे भविष्य धोक्यात येत असून अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडत असल्याची बाब समितीने निदर्शनास आणून दिली आहे.

समितीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर जिल्ह्यात ऑनलाइन क्रिकेट बेटिंग, बिंगो, ऑनलाइन रमी, कॅसिनो तसेच विविध बेकायदेशीर जुगार ॲप्सच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार सुरू आहेत. या माध्यमातून लाखो रुपयांची बेकायदेशीर उलाढाल होत असल्याची चर्चा असून अनेक युवक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिक सहज पैसे कमावण्याच्या मोहापायी या जुगाराच्या विळख्यात अडकत आहेत. या जुगारामुळे अनेक युवक कर्जबाजारी होत असून खासगी सावकारांच्या तगाद्याला सामोरे जावे लागत आहे. आर्थिक नुकसान, कौटुंबिक कलह, मानसिक तणाव आणि नैराश्य यांसारख्या समस्या निर्माण होत आहेत. राज्यातील विविध भागांत आर्थिक तणावातून आत्महत्यांच्या घटना समोर येत असल्याचा उल्लेख



करून अहिल्यानगर जिल्ह्यातही अशी परिस्थिती उद्भवण्यापूर्वी प्रतिबंधात्मक आणि कठोर उपाययोजना करण्याची गरज समितीने व्यक्त केली आहे.

समितीच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणाची चौकशी करताना महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० तसेच प्रकरणानुसार लागू होऊ शकणाऱ्या भारतीय न्याय संहिता आणि आर्थिक गुन्ह्यांशी संबंधित इतर कायद्यांतील तरतुदींचा वापर करून संबंधितांविरुद्ध कठोर गुन्हे नोंदविण्यात यावेत.

अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू असलेल्या सर्व बेकायदेशीर ऑनलाइन जुगार ॲप्स, वेबसाइट्स, टेलिग्राम आणि व्हॉट्सॲप गट तसेच एजंट्सवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. या व्यवसायाशी संबंधित बँक खाती, UPI आयडी, डिजिटल वॉलेट्स आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करून आवश्यकतेनुसार ती गोठविण्याची कार्यवाही करण्यात यावी. संपूर्ण रॅकेटमागील मुख्य सूत्रधार, एजंट, आर्थिक लाभार्थी आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर कठोर गुन्हे दाखल करून त्यांना तातडीने अटक करण्यात यावी. सायबर पोलीस, स्थानिक पोलीस आणि गुन्हे शाखेचे संयुक्त विशेष पथक स्थापन करून सातत्याने शोधमोहीम व कारवाई राबविण्यात यावी. युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाइन जुगाराच्या दुष्परिणामांविषयी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. या प्रकरणातील कारवाईचा नियमित सार्वजनिक अहवाल प्रसिद्ध करून नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

ऑनलाइन जुगाराचा वाढता विळखा हा केवळ आर्थिक गुन्ह्यांचा विषय नसून तो युवकांचे भविष्य, कुटुंबांचे आर्थिक स्थैर्य आणि सम ाजातील कायदा व सुव्यवस्था यांच्याशी थेट संबंधित आहे.

त्यामुळे या प्रकरणाची शासनाने तातडीने दखल घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# अमली पदार्थाविरोधात नगर जिल्ह्यात जनजागृतीसह कठोर कारवाई करावी

## निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांचे निर्देश

नगर - अमली पदार्थांचे वाढते दुष्परिणाम लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह जनजागृती व प्रभावी अंमलबजावणी यांवर विशेष भर देणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, औद्योगिक क्षेत्र तसेच समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत मादक पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी प्रभावी जनजागृती करून व्यसनमुक्त समाज निर्माण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय नार्को को-ऑर्डिनेशन सेंटर समितीच्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, तहसीलदार नागेश गायकवाड, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपअधीक्षक प्रवीणकुमार तेली, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, सहायक उपवनसंरक्षक अश्विनी दिघे, औषध निरीक्षक सो. बा. मुळे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते म्हणाले की, अमली पदार्थांविरोधात समाजात व्यापक जनजागृती करणे आवश्यक आहे. शाळा व महाविद्यालयांतील मुख्याध्यापक, प्राचार्य व शिक्षक यांच्यासाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये मादक पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता निर्माण करावी. युवकांपर्यंत व्यसनमुक्तीचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. ते पुढे म्हणाले की, औद्योगिक क्षेत्रातील कामगारांमध्ये अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणामांविषयी जनजागृती करण्यात यावी. संबंधित विभागांनी उद्योगांशी समन्वय साधून विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत. यामुळे व्यसनमुक्त व निरोगी कार्यसंस्कृती विकसित होण्यास मदत होईल. तसेच, जिल्ह्यातील बंद पडलेल्या रासायनिक कारखान्यांवर नियमित लक्ष ठेवून त्यांचा कोणत्याही बेकायदेशीर कामासाठी वापर होणार नाही, याची दक्षता घ्यावी. महसूल, पोलीस, राज्य उत्पादन शुल्क व संबंधित विभागांनी संयुक्तपणे अशा ठिकाणांची नियमित तपासणी करून संशयास्पद हालचालींवर तत्काळ कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

याशिवाय, सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने या काळात अमली पदार्थांच्या बेकायदेशीर लागवडीची शक्यता लक्षात घेऊन वन व कृषी विभागाने अधिक सतर्क राहावे. दुर्गम भाग, वनक्षेत्र तसेच संशयित ठिकाणांची नियमित पाहणी करावी. अमली पदार्थांची बेकायदेशीर लागवड आढळल्यास संबंधित पिके तात्काळ नष्ट करून जबाबदार व्यक्तींवर कारवाई करावी, असे निर्देशही श्री. गिते यांनी दिले.

# कारागृहातून सुटताच विनापरवाना रॅली काढून दहशत माजवणाऱ्या 'सराईत गुन्हेगार भोऱ्या काळे' याला अखेर पोलिसांनी केले जेरबंद



नगर - खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी आणि खून यांसारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेला नागपूर एमआयडीसी भागातील सराईत गुन्हेगार भोऱ्या ऊर्फ विठ्ठल नवनाथ काळे (वय १९, रा. बोल्हेगाव फाटा, ता. जि. अहिल्यानगर) याने न्यायालयातून जामिनावर सुटताच बेकायदेशीर दुचाकी रॅली काढून दहशत माजवल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी जेरबंद केले आहे. गुन्हेगारीचे उदात्तीकरण केल्याप्रकरणी त्याच्यासह साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी भोऱ्या याला नगर तालुका पोलीस ठाण्यातील एका गुन्ह्यात न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. ४ जुलै २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हा कारागृह वर्ग-२ येथून जामिनावर बाहेर येताच, त्याने व त्याच्या १० ते १५ साथीदारांनी मिळून नियमांची पायमल्ली केली. कारागृहापासून ते नागापूर एमआयडीसीपर्यंत विनापरवाना दुचाकींवरून घोषणाबाजी करत, आरडाओरड करत बेकायदेशीर जमाव जमवून मिरवणूक काढली. या मिरवणुकीचा ऑडिओ आणि व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून समाजात दहशत निर्माण करण्याचा व गुन्हेगारीचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ भोऱ्या याला ताब्यात घेतले.

या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी भोऱ्यासह त्याच्या साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये भोऱ्या ऊर्फ विठ्ठल नवनाथ काळे (वय १९, रा. बोल्हेगाव फाटा), धिरज ऊर्फ जॉकी जॉन आवारे (रा. गणेश चौक, बोल्हेगाव), सुजल ऊर्फ गोट्या भाकरे (रा. नागापूर), चेतन ऊर्फ भैय्या संतोष सरोदे (रा. गांधीनगर, बोल्हेगाव), यश शिरसाठ (पूर्ण नाव माहिती नाही), निकेश विश्वास कळंकुंबे (रा. नागापूर), गणेश विठ्ठल काळे (रा. बोल्हेगाव फाटा) यांच्यासह इतर १० ते १५ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. भोऱ्या याला अटक केल्यानंतर त्याच्या इतर साथीदारांचा पोलीस शोध घेत आहेत.

अटक करण्यात आलेला आरोपी भोऱ्या हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी विविध पोलीस ठाण्यांमध्ये तब्बल १० गंभीर गुन्हे दाखल आहेत. यामध्ये एमआयडीसी पोलीस ठाण्यात खून, खुनाचा प्रयत्न आणि मारामारीचे एकूण ५ गुन्हे दाखल आहेत. नगर तालुका पोलीस ठाण्यात चोरी व इतर कलमांखाली ४ गुन्हे दाखल आहेत. सुपा पोलीस ठाणे येथेही एक गुन्हा दाखल आहे.

ही कारवाई अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, सहाय्यक फौजदार राकेश खेडकर, हेडकॉन्स्टेबल राजू सुद्रिक, शैलेश रोहोकले, संदीप पवार, गणेश चौधरी, कॉन्स्टेबल किशोर जाधव, दहिफळे आणि दिपक फुंदे यांच्या पथकाने केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### 'स्क्रीन'ची नशा ठरेल डोळ्यांना शिक्षा

मोबाईल, लॅपटॉपशिवाय आता पानही हलत नाही. पण दिवसाचे ८-१० तास स्क्रीनसमोर बसणं म्हणजे डोळ्यांना शिक्षाच. यालाच डॉक्टर 'डिजिटल आय स्ट्रेन' म्हणतात. सतत स्क्रीन पाहिल्याने पापण्या लवण्याचं प्रमाण निम्म्यावर येतं. त्यामुळे डोळे कोरडे पडतात, जळजळ होते. 'ब्लू लाईट'मुळे झोप उडते, डोकं दुखतं आणि मुलांचे नंबर वाढताहेत. यावर सोपा म्हणजे '२०-२०-२०' नियम पाळा. दर २० मिनिटांनी २० फूट लांब २० सेकंद पहा. अंधारात मोबाईल नको. झोपण्याआधी १ तास स्क्रीन बंद करा. डोळ्यांवर थंड पाण्याचे हबके मारा. आवळा, गाजर, पालक खा. त्रिफळा पाण्याने डोळे धुवा. अँटी-ग्लेअर चष्मा वापरा. महागड्या ड्रॉपपेक्षा स्क्रीनपासून लांब राहणं उत्तम. कारण डोळेच गेले तर जगातला मोठ्यातला मोठा स्क्रीनही कामाचा नाही. डोळे सतत लाल, अंधुक दिसत असतील तर डॉक्टरांना दाखवा. ६ महिन्यांनी नेत्र तपासणी करा.

## पाककला

### कोल्हापुरी मिसळ

**साहित्य** : मोड आलेली मटकी १ वाटी, बारीक चिरलेला कांदा २ मध्यम, टोमॅटो १ मोठा, आलं-लसूण पेस्ट १ चमचा, कोल्हापुरी कांदा-लसूण मसाला ३ चमचे, लाल तिखट १ चमचा, हळद १/२ चमचा, गरम मसाला १/२ चमचा, तेल ४ चमचे, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, फरसाण १ वाटी, पाव ४, लिंबू १, बारीक चिरलेला कांदा व कोथिंबीर सजावटीसाठी

**कृती** : मोडाची मटकी कुकरमध्ये मीठ आणि हळद घालून २ शिट्ट्या करून शिजवून घ्या. कढईत तेल गरम करून त्यात बारीक चिरलेला कांदा सोनेरी रंगावर परतून घ्या. त्यात आलं-लसूण पेस्ट घालून कच्चा वास जाईपर्यंत परता. आता बारीक चिरलेला टोमॅटो घालून तेल सुटेपर्यंत शिजवा. यामध्ये कोल्हापुरी कांदा-लसूण मसाला, लाल तिखट, गरम मसाला घालून २ मिनिटे परता. शिजलेली मटकी आणि आवश्यकतेनुसार गरम पाणी घालून उकळी आणा. हा झाला आपला झणझणीत 'कट'. मीठ आणि कोथिंबीर घालून एकजीव करा. सर्व्ह करताना खोलगट प्लेटमध्ये प्रथम फरसाण घाला. त्यावर तयार कट ओता. वरून बारीक चिरलेला कांदा, कोथिंबीर पेरा. सोबत लिंबाची फोड आणि बटर लावून गरम केलेला पाव द्या. झणझणीत मिसळ तयार. तिखट आवडणाऱ्यांसाठी वरून एक्स्ट्रा कांदा-लसूण मसाला भुरभुरा.

## वास्तू

### झुंबर आणि कंदील

✻ बैठकीच्या खोलीत मध्यभागी अँटिक झुंबर किंवा पितळी कंदील लावल्याने घराला राजेशाही लूक येतो.

✻ वास्तुनुसार प्रकाश नेहमी वरून खाली आला पाहिजे, याने भरभराट होते.

✻ धावणारे ७ घोडे, उगवता सूर्य, फुलपाखरे यांची अँटिक फ्रेम लावा.

## सौंदर्य

२ चमचे मेथी रात्रभर भिजवा. सकाळी वाटून त्यात दही मिसळा. हा मास्क टाळूला ४० मिनिटे लावा. कोंडा गायब होतो.

## सल्ला

कुकरमध्ये भात लावताना तांदूळ समतल करून त्यावर बोट ठेवा. पाण्याची पातळी बोटाच्या पहिल्या पेरापर्यंत आली की भात मोकळा होतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ८ जुलै २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, रेवती १६।००, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित रहाल. घाई करणे अडचणीत टाकू शकते. पैसे कमविण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल.

**वृषभ** : चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे. आजचा दिवस विधायक कामासाठी चांगला आहे. आपला जोडीदार आपल्या बरोबर राहिल.

**मिथुन** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. मनोरंजनावर खर्च होईल.

**कर्क** : उत्तम भोजनाचे सुख मिळेल. मित्रांपासून आनंद मिळेल. प्रेमसंबंधात यश मिळेल. आपत्यांपासून आनंदप्राप्ती होईल. वाहनसुख मिळेल.

**सिंह** : योजनाबद्धरितीने आपले काम करण्याचा प्रयत्न कराल. कार्य एखाद्यावर विसंबून करणार नाहीत.

**कन्या** : नेहमीपेक्षा अधिक चांगले काही घडण्यासाठी आपणास आपल्या कामात एकाग्रता वाढवण्याची आवश्यकता आहे.

**तूळ** : जुने मित्र मंडळी भेटतील. वाहने व उपकरणे जपून वापरावीत. मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील.

**वृश्चिक** : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.


**धनु** : मनोरंजनासाठी वेळ काढाल. एखाद्या कल्पक, सर्जनशील कार्यात गुंतलेले राहू शकता. मित्रांकडून सहयोग मिळेल. व्यापार-व्यवसायात स्थितीत सुधार होईल.

**मकर** : आरोग्य उत्तम राहील. आपल्या हातात आलेल्या संधी निसटू देऊ नका. मागील उधारी उसनवारी वसुल होईल. अनुकूल स्थिती मिळेल. प्रसिद्धी मिळेल.

**कुंभ** : आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. प्रशासकीय कामे पूर्ण होतील. नवीन कार्याचे स्वरूप बनविण्यासाठी वेळ उत्तम.

**मीन** : व्यापार-व्यवसायात स्थिती नरम-गरम राहील. आरोग्य उत्तम राहील व एखाद्या जुन्या मित्राशी भेट होण्याची शक्यता.

## शब्दगंध क्र. ७४६८ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) हिंदूंचे तीर्थक्षेत्र असलेला हिमालयातील एक जलाशय ६) राक्षसी; डाकीण ७) उसाचे शेत; कुस्तीचे मैदान ८) हलणारे; विनाशी १०) अतिशय प्रयत्न; पंचाईत; अडचण १२) कापडी भिंत; पडदा १३) दर श्रावण सोमवारी शाहीर लोक लावण्या, पोवाडे वगैरे कार्यक्रम करतात तो १४) प्रमणापत्र; सरकारी शिक्कापत्र; १५) दार; दरवाजा; द्वार १७) कामबंद आंदोलन; हरताळ १९) ठाण; दोरा; ठिकाण; पत्ता २०) ताशावरची झोड; खरडपट्टी २२) निमिष; क्षण २३) एक लिंबूवर्गीय फळ

**उभे शब्द :-** १) धनवान; श्रीमंत; सधन २) पती; स्वामी; मालक ३) एक फळ ४) हडकुळा; कृश; इंग्रजीत रस्ता ५) व्यवस्था; मांडणी ९) कितीही सांगितले तरी पुन्हा पुन्हा तीच चूक करणारा; निर्लज्ज ११) मोजणी; गणती १४) सर्व अंग टेकून; हातपाय पसरून १६) खिडकी; झरोका; गवाक्ष १७) रागाचा आवेश; अतिराग १८) केस काळे करण्याचे रसायन २१) भस्म; रक्षा

### शब्दगंध क्र. ७४६७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| का | व | ■ | म | ■ | फ | र | क |
| य | श | पा | ल | श | र्मा | ■ | ळ |
| दा | ■ | रा | म | ■ | न | व | स |
| ■ | का | वा | ■ | बी | ■ | च | ■ |
| स | म | र | स | ■ | ब | क | रा |
| ■ | गा | ■ | म | हा | न | ■ | ज |
| कौ | र | व | ■ | ल | ■ | घा | व |
| ल | ■ | सा | के | त | ■ | त | ट |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : आईच्या पदराने पुसलेले अश्रू आयुष्यभराची श्रीमंती देऊन जातात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### सरड्याची शेपूट तुटली तरी परत कशी येते? माणसाचे हात-पाय का येत नाहीत?

निसर्गात काही प्राण्यांना देवाने अशी भारी शक्ती दिली आहे की आपण थक्क होतो. सरडा त्यातलाच एक. मांजराने किंवा आपण पकडायला गेलो की सरडा स्वतःची शेपूट तोडून पळून जातो. पण गंमत म्हणजे ३-४ आठवड्यात त्याला नवी शेपूट येते. हे कसं होतं?

सरड्याची 'स्पेअर पार्ट' शक्ती : सरड्याच्या शेपटीत आधीपासूनच काही ठिकाणी 'कमकुवत सांधे' असतात. धोका दिसला की तो स्नायू आवळून शेपूट तोडतो. तुटलेली शेपूट काही वेळ वळवळत राहते आणि शत्रूचे लक्ष त्याकडे जाते. तोपर्यंत सरडा पसार. शेपूट तुटल्यावर जखमेवर लगेच रक्त गोठते. मग तिथल्या काही खास पेशी, ज्यांना 'ब्लास्टेमा पेशी' म्हणतात, कामाला लागतात. या पेशी म्हणजे नुसत्या जादूगार. त्या हाड, कातडी, स्नायू, रक्तवाहिन्या सगळं नव्याने बनवतात. जणू थ्रि-डी प्रिंटरच.

१-२ महिन्यात नवी शेपूट तयार होते, फक्त आधीपेक्षा थोडी आखूड आणि रंगाने वेगळी असते. मग माणसाचे हात-पाय का येत नाहीत? आपल्यात पण 'ब्लास्टेमा' सारख्या पेशी असतात, पण त्या फक्त लहान जखम, मोडलेले हाड जोडण्यापुरत्याच काम करतात. उत्क्रांतीमध्ये माणसाने मोठा मेंदू, गुंतागुंतीचे अवयव विकसित केले. एवढे किचकट अवयव परत बनवणे शरीराला परवडणारे नाही. शेपूट परत बनवताना खूप ऊर्जा लागते आणि संसर्गाचा धोका असतो. निसर्गाने हिशोब केला - माणसाला हात-पाय तोडून पळून जाण्याची गरज कमी, पण जखम लवकर भरून येणे जास्त महत्त्वाचे. म्हणून आपल्या शरीराने 'जखम भरून काढा, पण नवा हात बनवू नका' असा प्रोग्राम सेट केला. थोडक्यात : सरडा जगण्यासाठी शेपूट सोडतो, म्हणून निसर्गाने त्याला 'स्पेअर पार्ट' दिला. माणसाने जगण्यासाठी मेंदू वापरला, म्हणून आपल्याला जखम भरण्यापुरतीच शक्ती मिळाली.

शास्त्रज्ञ आता सरड्याच्या या पेशींचा अभ्यास करून भविष्यात माणसाची बोटे किंवा अवयव परत येतील का, यावर संशोधन करत आहेत. कदाचित पुढच्या पिढीत हे शक्य होईल!

फक्त सरडाच नाही तर तारामासा, झुरळ, खेकडा, काही बेडूक आणि सॅलॅमँडर हे पण तुटलेले अवयव परत बनवतात. सॅलॅमँडर तर पूर्ण पाय, डोळ्याचा भाग, हृदयाचा थोडा भागसुद्धा परत बनवतो. माणसाच्या शरीरात जन्माच्या वेळी सगळे अवयव तयार होतात. नंतर 'स्टेम सेल्स' फक्त दुरुस्तीचे काम करतात. लहान बाळाच्या बोटाचे टोक कापले गेले तर काही वेळा ते परत येते, पण मोठ्या माणसात ही ताकद राहत नाही. कारण आपल्या पेशींचा 'फक्त एकदाच बनवा' असा लॉक होतो.

जर माणसाला हात-पाय परत बनवायची शक्ती दिली असती तर कॅन्सरचा धोका १०० पटीने वाढला असता. कारण 'परत बनवणाऱ्या' पेशी आणि कॅन्सरच्या पेशी खूप सारख्या असतात. निसर्गाने आपल्याला कॅन्सरपासून वाचवण्यासाठी ही शक्ती काढून घेतली. आज शास्त्रज्ञ सरड्याच्या ब्लास्टेमा पेशींचे जनुक शोधून काढत आहेत. ३डी बायो-प्रिंटिंग आणि स्टेम सेल थेरपीमुळे २०५० पर्यंत माणसाची बोटे किंवा कानाची पाळी लॅबमध्ये बनवून जोडणे शक्य होईल, असे शास्त्रज्ञांना वाटते.

सरडा जगण्यासाठी शेपूट सोडतो, म्हणून निसर्गाने त्याला 'स्पेअर पार्ट' दिला. माणसाने जगण्यासाठी मेंदू वापरला, म्हणून आपल्याला जखम भरण्यापुरतीच शक्ती मिळाली. पण विज्ञानामुळे उद्या कदाचित आपण पण सरड्यासारखे 'रिपेअर' होऊ शकू!

### जशास तसे

एका घनदाट जंगलात एक उंच उंट आणि एक धूर्त कोल्हा मित्र झाले. उंट गवत खाऊन पोट भरायचा, तर कोल्हा इकडून-तिकडून लपून-छपून खायचा. दोघांनी ठरवले की नदीपलीकडच्या शेतात जाऊन पोटभर खाऊ. नदीला पूर आला होता.

उंट म्हणाला, मी उंच आहे, तू माझ्या पाठीवर बस. मी तुला पैलतीराला नेतो. कोल्हा खूश झाला. दोघे नदीपार गेले. शेतात ज्वारी पिकली होती. उंट ज्वारी खाऊ लागला, आणि कोल्ह्याला जवळच्या मळ्यात कोंबड्या दिसल्या. कोल्ह्याने चोरून दोन कोंबड्या खाल्ल्या आणि पोट भरल्यावर मस्ती आली. तो उंटाला म्हणाला, दादा, माझी एक सवय आहे. जेवल्यावर मी मोठ्याने गाणे म्हणतो. उंट घाबरून म्हणाला, अरे बाबा, शेतकरी जागा होईल. गाऊ नकोस. पण कोल्हा ऐकेना. त्याने जोरात कूऊऊऊ...हूऊऊ करून ओरडायला सुरुवात केली. आवाज ऐकून शेतकरी काठ्या घेऊन धावले. उंटाला मार बसला. कोल्हा मात्र पटकन बिळात लपला. मार खाऊन उंट परत निघाला. आता नदी पार करायची होती. कोल्हा पुन्हा उंटाच्या पाठीवर बसला.

नदीच्या मधोमध आल्यावर उंट म्हणाला, मित्रा, माझी पण एक सवय आहे. पाणी लागले की मला लोळायची इच्छा होते. कोल्हा ओरडला, अरे असे करू नकोस, मी बुडेन. उंट हसून म्हणाला, जेवल्यावर गाणे म्हणणे जशी तुझी सवय, तशी पाण्यात लोळणे माझी सवय. असे म्हणून उंटाने पाण्यात अंग टाकले. कोल्हा वाहून गेला. उंट मात्र आरामात पोहत पैलतीराला गेला.

बोध : फक्त स्वतःचा विचार करून दुसऱ्याला संकटात टाकू नये. जशास तसे उत्तर मिळतेच.



## आत्मशक्ति

### तेजस्वी प्रकाश

एका अत्यंत अरुंद अशा अंधकारमय बोगद्यातून स्वतः गेल्याची त्यांना जाणीव झाली. त्या बोगद्याच्या टोकास अतिशय तीव्र असा तो प्रकाश होता.

ह्या पृथ्वीवर पाहिलेल्या प्रकाशापेक्षा अति तेजस्वी असा तो प्रकाश होता. मात्र डोळ्यांना त्रासदायक वाटत नव्हता, तर त्याच्यात आश्चर्यकारक ऊब होती व ती प्रेमाने पुरेपूर भरलेली होती.

बहुतेक लोक तेथे एका ज्योतिर्मय पुरुषाला भेटले. ह्या पृथ्वीवर कोणीही त्यांना एवढे प्रेम दिले नसेल, एवढे प्रेम त्याने त्यांना दिले. ह्या जीवनात घडलेल्या घटना व केलेली कर्मे ह्याचीही कांही दृश्ये त्यांना तेथे पहावयास मिळाली. एवढेच नव्हे तर त्यांना त्या घटनेमागील त्यांच्या भावना व त्या घटना संबंधित इतर लोकांच्या भावनाही समजल्या.त्यांनी इतरांना जी दुःखे दिली, त्या दुःखांनाही त्यांनी जाणले. त्यांनी इतरांना जी काही सुखे दिलीत, त्या सुखांच्या भावनाही त्यांनी अनुभवल्या. जीवनभरच्या त्यांच्या घटना तेथे पुनः पहाण्यात आल्याने नंतर त्यांचे आयुष्यच बदलून गेले. चालू जीवनाच्या सीमा ओलांडून त्यांनी जेव्हा त्या दुसऱ्या जगात प्रवेश केला, तेव्हा त्यांना कळून चुकले की, ह्या (चालू) जीवनात कितीही धन कमावले, कितीही संपत्ति जमा केली, कितीही अधिकार मिळविले अथवा किर्ती मिळविली, त्याची तेथे काहीही किंमत नाही, उलट त्यांनी येथे किती प्रेमाने जीवन व्यतीत केले हीच बाब महत्त्वाची होती. तेथे प्रेम हेच त्यांच्या जीवनाचे साफल्य मोजण्याचे साधन होते. जेव्हा त्यांनी आपल्या शरीरात पुनः प्रवेश केला, तेव्हा पुनर्जीवनांत त्यांचे सारे आयुष्यच बदलून गेले. अगदी मोठ्या प्रमाणात त्यांच्या मनात आसपासच्या लोकांबद्दल प्रेम, सेवावृत्ती आणि दया उत्पन्न झाली व ते माणसाच्या कल्याणाबाबत विचार करू लागले. त्यांनी असेही सांगितले की दुसऱ्या जगात त्यांना, तेथेच रहावयाचे की पुनः पृथ्वीवर जावयाचे, असे विचारण्यात आले.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### ध्यान आणि चिंतन

आरामात बसा... स्वतःवर लक्ष केंद्रित करा... मी, आत्मा... इतरांना देणं आणि सेवा करणं हाच माझा मूळ गुण आहे... हा माझा सहज संस्कार आहे... मी जितकं देतो, तितकाच सशक्त बनतो... आज मी ज्यांना भेटणार आहे, ज्या घटनेतून जाणार आहे... त्यात मी हे लक्षात ठेवेन की मला त्यांच्याकडून काही घ्यायचं नाहीये... मला त्यांना द्यायचं आहे कारण हाच माझा मूळ गुण आहे... त्यांनी माझा आदर करावा अशी माझी अपेक्षा असेल तर हे त्यांच्याकडून काही घेण्यासारखं असेल... मी विचार बदलत आहे... मी इतरांना आदर देतो... भलेही त्यांचं पद किंवा भूमिका कोणतीही असो... मी भौतिक आणि सूक्ष्म अशा दोन्हींही रूपांत देतो... मी ज्याला भेटतो, त्याला मी वाटतो... मी संपूर्ण सहकार्य करतो... सातत्याने करतो... हा एक देवाचा संस्कार आहे... मी जितकं जास्त देतो, माझ्या आत्म्याची बॅटरी तितकीच चार्ज होते... हा माझा आध्यात्मिक विकास, आध्यात्मिक शक्ती आहे.... ओम शांती!

चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्र

आपण जे काही मिळवतो त्याआधारे आपण आपली प्रतिमा बनवतो आणि लोकांनी आपल्याशी कसं वागावं हे ठरवतो. आपल्या अपेक्षांनुसार ते वागले नाहीत तर आपल्याला दुःख होतं.

स्व-रचित प्रतिमेअनुसार आपण लोकांना भेटतो तेव्हा त्यांच्याकडून प्रेमाची आणि आदराची अपेक्षा ठेवतो. अशा प्रकारे आपण घेण्याच्या भावात येतो - आपल्याला दुसऱ्यांकडून पाहिजे असतं.

आदर मिळवण्याच्या अपेक्षेचा त्याग करून आपण जेव्हा प्रेम आणि आदर देण्याचा भाव अंगीकारतो तेव्हा आपण घेण्याच्या भावनेतून देण्याच्या भावनेत जातो. देताना आपल्याला खूप हलकं आणि प्रसन्न वाटतं कारण आधी आपल्याला त्या प्रेमाची ऊर्जा जाणवते.

टिकून किंवा जिवंत राहण्याच्या नियमावर आपण चुकीचा विश्वास ठेवतो. आपल्या जीवनाचा उद्देश टिकून राहणं नसून इतरांची सेवा करणं हा आहे. निसर्गात सगळं काही इतरांची सेवा करण्यासाठी आहे. आपणही प्रेमाच्या आणि शांतीच्या तरंगांसह इतरांची सेवा करण्याचा उद्देश ठेवला पाहिजे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**सून** : आई, मी तुमच्या मुलाशी लग्न करून चूक केली का हो?

**सासू** : अगं, चूक एकटीने केली नाहीस... आम्ही पण तुला पसंत करून केलीय. आता दोघी मिळून त्याला सुधारूया.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा इंग्लंडचा पंतप्रधान कोण होता?

- क्लेमेंट ॲटली

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### बीट

६) भूक न लागणे, अपचन, तोंडाला चव नसणे, उलट्या, जुलाब या विकारांवर बीटच्या रसात अर्ध लिंबू पिळून तो रस अर्धा कप सकाळ-संध्याकाळ घ्यावा. असे केल्याने पचन व्यवस्थित होऊन भूक व्यवस्थित लागते.

७) कावीळ, आंत्रव्रण, आम्लपित्त या विकारांवर बिटाच्या पानांचा रस सकाळ-संध्याकाळ एक कप प्यावा.

८) बीटमध्ये तंतुमय पदार्थ भरपूर प्रमाणात असल्याने आतड्यातील मल पुढे ढकलून आतडे स्वच्छ करण्याचे काम बीट करते. म्हणून मलावष्टंभाची तक्रार असणाऱ्यांनी शौचास साफ होण्यासाठी बीट नियमितपणे खावे.

९) बिटाच्या पानांचा काढा केसांतील कोंडा नाहीसा होण्यासाठी, तसेच केसांतील उवा नाहीशा करण्यासाठी, केस धुण्यासाठी वापरावा. यामुळे केसांचे आरोग्य चांगले राहून केस लांबसडक होतात.

१०) डोक्यातील चाई नष्ट करण्यासाठी बिटाच्या पानांचा रस डोक्याला चोळावा. याने चाई कमी होण्यास मदत होते.

११) बीट, काकडी, गाजर, पपई यांचा रस एकत्रित करून घेतल्यास शरीर आरोग्यपूर्ण राहते.

१२) मानसिक थकवा वारंवार जास्त जाणवत असेल, तर अशा वेळी बिटाचा रस कपभर दोन वेळा घ्यावा. बिटाच्या पानांची भाजी, थालीपीठ, पराठा तसेच बिटाची कोशिंबीर, हलवा, सॅलड अशा विविध स्वरूपात बिटाचा स्वास्थ्यरक्षणार्थ आहारामध्ये वापर करावा.

सावधानता :

बीट हे कंदमूळ पचण्यास जड असल्यामुळे भूक मंद असणाऱ्यांनी व पचनशक्ती कमी असणाऱ्यांनी त्याचा वापर योग्य प्रमाणातच करावा. एकदम बीट खाण्यापेक्षा थोड्या प्रमाणात नियमित खावे. अतिरिक्त प्रमाणात खाण्यात आल्यास पोटात गुबारा धरून जुलाब होऊ शकतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



'हरित कल्याण रोड परिसर संकल्प मोहिमेचा' शुभारंभ उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला.

# 'हरित कल्याण रोड' संकल्प मोहिमेचा शुभारंभ

### ५०० वृक्षांच्या लागवड व संवर्धनाचा निर्धार; शिवक्रांती प्रतिष्ठान व महापालिकेचा पर्यावरणपूरक उपक्रम; उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते वृक्षारोपण

नगर – शहरातील प्रभाग क्रमांक १५ मध्ये शिवक्रांती प्रतिष्ठान आणि अहिल्यानगर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने 'हरित कल्याण रोड परिसर संकल्प मोहिमेचा' शुभारंभ उत्साहात करण्यात आला. विद्या कॉलनी येथे उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते वृक्षारोपण करून या महत्त्वाकांक्षी अभियानाची सुरुवात करण्यात आली. या मोहिमेअंतर्गत परिसरात ५०० वृक्षांची लागवड करून त्यांचे दीर्घकालीन संवर्धन करण्याची जबाबदारी शिवक्रांती प्रतिष्ठान आणि नगरसेवक दत्ता गाडळकर यांनी स्वीकारली आहे.

शुभारंभप्रसंगी माजी प्राचार्य खासेराव शितोळे, प्रा. भगवानराव काटे, भाऊसाहेब सोनवणे, सुरेश ढवळे, बाबासाहेब आंधळे, बबनराव तोडकर, वायकर, परशुराम कोतकर, थोटे, भापकर, शक्ती सोनवणे, अभय शेंडगे, मंगेश भापकर, प्रथमेश सोनवणे, एकनाथ व्यवहारे यांच्यासह युवा कार्यकर्ते हर्षल दावभट, सर्वेश गाडळकर, सौरव ढवळे, शंतनू गाडळकर, सुरज साळवे, प्रतीक सोनवणे, रवी शेळके, यश देवकर, सुजित कर्डिले, हर्षल घुमरे, ऋषिकेश कर्डिले, अभिषेक दराडे, तेजस पवार, पियुष गुंडू, ऋषिकेश ढवळे, आकाश शेंडगे, जयदीप ठाणगे, सोमेश सोनवणे, नागेश पंधरकर, ऋषिकेश कांडेकर, ओम करांडे, ओंकार नजन, संकेत सोनवणे, स्वराज तोडकर, गौरव सुंबे, संकेत गुंड, सुमित पिसे, श्रेयस व्यवहारे, योगेश भापकर, पृथ्वीराज मिसाळ, जय कोरडे, श्लोक कोतकर, यश विधावे, उत्कर्ष साठे, वैभव साबळे, समद सय्यद, कपिल जुंद्रे यांच्यासह परिसरातील नागरिक व महिला उपस्थित होत्या.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले, पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे. आज वाढते तापमान, प्रदूषण आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र ही गंभीर चिंतेची बाब आहे. अशा परिस्थितीत प्रत्येकाने आपल्या आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला पाहिजे. वृक्ष म्हणजे भविष्यातील पिढ्यांना दिलेली सर्वात मोठी भेट आहे. महापालिकेच्या हरित शहर उपक्रमाला हातभार लावण्यासाठी शिवक्रांती प्रतिष्ठानने घेतलेला हा पुढाकार इतर सामाजिक संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरेल. महापालिकेच्या माध्यमातून अशा पर्यावरणपूरक उपक्रमांना कायम प्रोत्साहन दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरसेवक दत्ता गाडळकर म्हणाले की, आज जगभरात हवामान बदलाचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. वाढते तापमान, अनियमित पाऊस, कुठे अतिवृष्टी तर कुठे दुष्काळ, अशा संकटांचा सामना संपूर्ण जग करत आहे. थंड हवामानासाठी ओळखल्या जाणाऱ्या देशांमध्येही विक्रमी उष्णतेच्या लाटा अनुभवायला मिळत आहेत. या परिस्थितीवर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे वृक्षसंवर्धन आवश्यक आहे. 'हरित कल्याण रोड' हा केवळ एक उपक्रम नसून भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवाईचा वारसा निर्माण करण्याचा संकल्प आहे. आम्ही ५०० वृक्षांची लागवड करून प्रत्येक झाड जगविण्याची जबाबदारी स्वीकारत आहोत. नागरिक, युवक व महिलांनीही अभियानात सहभागी होऊन प्रत्येक वृक्ष आपल्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे जपण्याचे त्यांनी आवाहन केले.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सुजय विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे आणि उपमहापौर धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

# प्रेरणादायी अक्षरधन

### धनामुळे मिळणारे भाग्य अशाश्वत

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स




धन आहे, तर दान आहे. दान आहे, तर मान आहे. मान आहे, जगण्यात शान आहे. बा माणसा, तुला याचे ज्ञान आहे? व्यवहारात याचे भान आहे. चाणक्यनीती सांगते.

माता निन्दति नाभिनन्दति । पिता भ्राता न संभाषते ।। भृत्य : कृप्यति नानुगच्छति । सुतः कान्तापि तो रज्यते।। अर्थ प्रार्थयतीति किं न कुरुते । संभाषण वा सुहृद ।। तस्माद द्रव्यमुपार्जयन्ति सुजना । द्रव्येण सर्वे वशाः ।।

तुमच्याजवळ पैसा नसेल तर आईदेखील म्हणते, हा पुत्र कैसा? वडील तरी कुठे मान देतील? भाऊ फुकट बोलायचा नाही. नोकर नाराज. मुलगादेखील नाक मुरडणार. बायकोला तुमच्यात कुठला रस ठरणार? मित्र फिरवतील पाठ, म्हणतील, पैसे उसने मागणे हा याचा रोजचा परिपाठ. म्हणून म्हणतात शहाणे, बा माणसा, पैसा मिळवणे, मग सगळे तुमच्या मुठीत. तुमच्याजवळ नाही द्रव्य, मग आम्हाला तुमच्याशी काय कर्तव्य ? संत तुकाराम महाराज धनाची महती सांगतात. धनवंता लागी । सर्व मान्यता हे जगी ।। माता पिता बंधू जन । सर्व मानिती वचन जव चाले मोठा धंदा । तव बहीण म्हणे दादा। सदाशृंगार भूषणे। कांता लवे बहुमाने ।।

पैसेवाले जगात भले, पैसेवाले मान्यवर झाले. आईवडील, भाऊबंद सगळे पैसेवाल्याच्या वचनात बंद. पैसे कसे मिळतात ते पाहू, मग बहीण म्हणेल भावाला भाऊ. बायकोला मिळू द्या दागदागिने तरीच तुमचे सर्व सुखाचे जिणे. भार्या पुत्र भगिनी माता आणि पिता । हे अवघे सर्वथा सुखाचेचि ।। इष्ट आणि मित्र स्वजन सोयरे । सुखाचे निर्धारि आप्तवर्ग ।

आईवडील, बायको भाऊ बहीण यांचे नाते तुमच्याशी? नाही, सुखाशी तुमच्याशी ? नाही, सुख देणाऱ्या धनाशी हे सगळे तुम्हाला राजी, पण तुमच्याजवळ हवी धनराशी मित्र आणि सोयरेदेखील मग धावत येतील तुमच्यापाशी. पण धन म्हणजे भाग्याचा केवळ एक क्षण. धन कुठे कुणापाशी टिकले ? म्हणून भाग्य तरी चिरंतन लाभले? धनामुळे प्राप्त होणारा भाग्यकाल हा क्षणैक टिकतो, मग करतो तुमचे हाल.

संत तुकाराम महाराज धनाची महती सांगून इशारा देतात, तुका म्हणे धन। भाग्य अशाश्वत जाण ।। द्रव्यामुळे प्राप्त होणारे भाग्य हे विश्वास ठेवण्यास अयोग्य. ते श्रावणातल्या पावसाच्या सरीसारखे. ते काय बसरणार एकसारखे ? धनाची हाव, ही सागरी फुटकी नाव. तीमुळे जिवावर घाव. सर्वनाशाला केवळ वाव.

एक होता शेतकरी. शेतात कष्ट करी. सोने आणी घरी. म्हणायचा, शेतातल्या नागाचा मी आभारी. तो नाग सोन्याचा दाता. तो रोज त्या नागाला दूध पाजी. एकदा तो गावाला गेला. त्याचा मुलगा नागाला दूध पाजायला गेला. त्याला वाटले नागाजवळ सोने आहे. तर मग नागाला मारले, तर त्याचे खूपसे सोने एकदमच मिळेल. द्रव्याची हाव, मग कुठले विवेकाचे नाव ? दूध प्यायला नाग आला. मुलाने तत्काळ काठीचा घाव घातला. दुर्दैवाने घाव चुकला. नाग त्याला डसला. मुलगा तात्काळ मृत्यू पावला.

वडील आले. खूप हळहळले. ते म्हणाले, अरे मुला, नागानं सोनं दिलं. असं मी का म्हटलं, ते समजून का नाही घेतलंस? शेतात पिकणारं अमाप पीक, त्यालाच मी सोनं मानलं. त्याचा दाता तो नाग, असं म्हटलं. त्या नागानंच शेतातले उंदीर, घुशी आणि इतर प्राणी मारले. त्याच्या उपकारामुळेच शेतात सोनं पिकलं.

**– किशोर गांधी**

# जैन मंदिरातील चातुर्मासानिमित्त मुनिराज ज्ञानप्रेमविजयजी महाराजा साहेब पिता पुत्रांचा ९ जुलैला अहिल्यानगमध्ये प्रवेश

नगर – जैन धर्मातील पवित्र अशा चातुर्मास पर्वाला लवकरच सुरुवात होत असून या काळात जप, तप, आराधना करण्यात येते. कापड बाजार जैन मंदिरात यंदाच्या वर्षी वैराग्य देशनादक्ष आचार्य भगवंत श्री हेमचंद्रसूरीश्वरजी महाराजा साहेब यांचे शिष्य मुनि ज्ञानप्रेमविजयजी महाराजा साहेब, मुनि हितप्रेमविजयजी महाराजा साहेब (आदिठाणा २) हे पितापुत्र सन २०२६ च्या चातुर्मासासाठी विराजमान असणार आहेत. त्यांचे ९ जुलै रोजी अहिल्यानगर शहरात आगमन होणार आहे, अशी माहिती जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा यांनी दिली.

चातुर्मास २०२६ बाबत अधिक माहिती देताना सुभाष मुथा यांनी सांगितले की, मुनि ज्ञानप्रेमविजयजी महाराजा साहेब (आदिठाणा २) ९ जुलै रोजी सकाळी ६.१५ वाजता नगर–पुणे रोडवरील कायनेटिक चौकात गाव प्रवेश करणार असून तेथून ते माणिकनगर जैन मंदिरात येणार आहे. याठिकाणी सकाळी ९ वाजता त्यांचे 'मनुष्य भवनी दुर्लभता' या विषयावर हिंदीतून व्याख्यान होईल.



१० जुलै रोजी सकाळी त्यांचा नवजीवन कॉलनी येथे प्रवेश होणार आहे. येथे त्यांचे 'जीनवाणी श्रवण का महत्त्व' या विषयावर हिंदीमध्ये व्याख्यान होईल.

११ जुलै रोजी त्यांचा नवजीवन कॉलनी येथून सिव्हील हडको श्री आदेश्वर जैन मंदिरात प्रवेश होईल. याठिकाणी सकाळी ९ वाजता त्यांचे 'संयम जीवन की दुर्लभता' या विषयावर हिंदीतून व्याख्यान होईल.

१२ जुलै रोजी सकाळी ७ वाजता लोकसेवा हॉटेल, तेलीखुंट येथून गुरु महाराजांचा सकल संघासह वाजत गाजत तेलीखुंट, घास गल्ली कोपरा, कोहिनूर, भिंगारवाला चौक येथून सकाळी ७.४५ वाजता त्यांचा कापड बाजार जैन मंदिरात उपाश्रय प्रवेश होणार आहे. त्यानंतर मांगलिक, प्रवचन, गुरु पूजन व कांबळीचा एकच चढावा होईल. यानंतर संघ पूजन करण्यात येईल.

यावेळी सकल संघासाठी बेसमेंटमध्ये नवकारशीची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व कार्यक्रमांना सकल संघाने सह परिवार उपस्थित राहण्याचे आवाहन जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा व सर्व ट्रस्टी मंडळाने केले आहे.

# विश्व सनातन धर्म सूर्य सेनेच्या प्रदेश संघटन सचिवपदी अहिल्यानगर येथील गणेशराव बनकर यांची नियुक्ती



नगर – विश्व सनातन धर्म सूर्य सेनेच्या प्रदेश संघटन सचिवपदी अहिल्यानगर येथील गणेश विठ्ठल बनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक सैनी यांच्या नेतृत्वाखाली तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक महासंघाचे उपसरसंघचालक संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली.

गणेश बनकर हे सध्या भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहे. तसेच ते अखिल भारतीय माळी महासंघात ज्येष्ठ पदाधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक महासंघाचे उपसरसंघचालक संजय जोशी यांनी युवकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, राष्ट्र उभारणीसाठी युवकांचे योगदान महत्त्वाचे आहे. युवकांना योग्य दिशा देण्यासाठी विश्व सनातन धर्म सूर्य सेना सातत्याने कार्यरत आहे. राष्ट्र उभारणीसाठी धर्म, संस्कृती आणि परंपरेचे जतन व संवर्धन प्रत्येक युवकाने स्वतःपासून सुरू करणे आवश्यक आहे. धर्म आणि संस्कृती यांचा संबंध केवळ परंपरेशी नसून तो राष्ट्रसेवा, सामाजिक उत्तरदायित्व आणि राष्ट्रीय एकात्मतेशी जोडलेला असावा, ही भावना युवकांच्या मनात रुजविण्याचे कार्य संघटनेच्या माध्यमातून केले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# आषाढी एकादशीनिमित्त आयोजित 'निर्मलवारी' उपक्रमात नागरिकांनी स्वयंसेवक म्हणून सहभागी होण्याचे आवाहन

नगर – जिल्ह्यात आषाढी एकादशी निमित्त येणाऱ्या संत निवृत्तिनाथ महाराजांच्या दिंडी मधील वारकऱ्यांच्या सेवेसाठी नगरच्या सेवा भरती, राष्ट्रीहित संवर्धक मंडळ व रा.स्व.संघाच्या वतीने 'निर्मलवारी' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या अंतर्गत दिंडीतील वारकऱ्यांसाठी मुक्कामाच्या ठिकाणी तात्पुरते शौचालय उभारण्यात येत असून ते वापरण्यासाठी त्यांना आग्रह धरण्यात येतो. याच्या यशस्वीतेसाठी स्वयंसेवकांची गरज आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात १० ते १७ जुलै दरम्यान हा निर्मलवारीचा उपक्रम रवण्यात येणार असून यामध्ये नागरिकांनी सहभागी होत वारीचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात येणाऱ्या संत निवृत्तीनाथ महाराजांच्या दिंडीच्या मुक्कामाच्या ठिकाणी निर्मलवारीचा उपक्रम २०२४ पासून राबवण्यात येत आहे. यंदा ११, १२ व १३ जुलै रोजी या दिंडीचा नगर शहरातील मार्केटयार्ड व क्लेराब्रूस हायस्कूल येथे मुक्कामाच्या ठिकाणी निर्मलवारीचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. या निर्मलवारी उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे.

संत निवृत्तीनाथ महाराजांच्या दिंडीतील वारकऱ्यांसाठी १० जुलै रोजी डोंगरगण येथून निर्मलवारी उपक्रमास सुरवात होणार असून १७ जुलै पर्यंत कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथे या उपक्रमाची सांगता होणार आहे. दिंडी मुकामाच्या ठिकाणी या भागातील नागरिकांनी स्वयंसेवक म्हणून या उपक्रमात सहभागी व्हावे.

वारीला जाऊन मनाची निर्मलता जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी वारीचा परिसर स्वच्छ ठेवण्याचं, गावकऱ्यांना रोगराईपासून वाचवण्याचं कार्य हे 'स्वयंसेवक' म्हणून आपण करणार आहोत. अधिक माहितीसाठी व निर्मलवारी उपक्रमात सहभागी होण्यासाठी डॉ. कृष्णा देहाडराय मो.नं. ८८०५९८२०८१, उदय भणगे मो.नं. ९२२६७२४०९२, राहुल गांधी मो.नं. ९८९०१५९६७३ व सुयोग दळवी मो.नं. ८७८८१९३५२५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गोरक्षनाथ गडावरून पायी दिंडीचे १४ जुलै रोजी पंढरपूरला प्रस्थान

### १५ व १६ जुलैला नगर शहरात आषाडी दिंडी सोहळा थांबणार



नगर – मांजरसुंबा येथील गोरक्षनाथ गडावरून सालाबादप्रमाणे १४ जुलै रोजी श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड ते पंढरपूर आषाडी दिंडी सोहळा प्रस्थान करणार असून दिंडीचे हे ४० वे वर्ष आहे

वैकुंठवासी बाळकृष्ण महाराज कदम यांनी प्रारंभ केलेली व राम महाराज पोते, वैगोरक्षनाथ महाराज ढोकणे, भाऊसाहेब महाराज हरिचंद्रे व दिंडी सोहळा ट्रस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली गर्भगिरी डोंगर रांगेतील नगर तालुक्यातील मांजरसुंबा येथील श्रीक्षेत्र गोरक्षनाथ गड येथून १४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता निघणार आहे.

दिंडी सोहळ्यात दररोज पहाटे ४ ते ५ श्री पूजा व अभिषेक, पहाटे ५ ते ६ आरती व दर्शन दुपारी प्रवचन व रात्री कीर्तन नंतर दिंडी प्रवासात अखंड भजन होणार आहे. दिंडी सोहळाचा पंढरपूर येथील मुक्काम श्री चैतन्य गोरक्षनाथ मंदिर, पंढरपूर टेंभुर्णी नाका, शिंदे नाईक मळा, पंढरपूर येथे राहणार आहे

दिंडी सोहळा गोरक्षनाथ गडावरून निघाल्यावर पहिला मुक्काम पिंपळगाव माळवी येथे राहणार असून दुसरा मुक्काम १५ जुलैला नगर मधील सावेडीतील सहकारनगर मध्ये राहणार असून तेथील व्यवस्था माऊली कृपा मित्र मंडळ यांनी केली आहे.

१६ जुलैला दिंडी सोहळा समतानगर येथे डॉ. प्रकाश जाधव यांचे येथे सकाळचा नाश्ता घेणार असून रात्रीचा मुक्काम नगर तालुक्यातील दहिगाव येथे राहणार आहे.

१९ जुलै रोजी चापडगाव येथे घोड्याचे रिंगण होणार आहे. पुढे करमाळा मार्गे पंढरपूरला हा सोहळा पोचणार आहे. द्वादशीला काल्याचा प्रसाद झाल्यानंतर दिंडी सोहळा विसर्जित होणार आहे

ओम चैतन्य गोरक्षनाथ दिंडी सोहळा ट्रस्ट कै. दादासाहेब जाधव यांनी स्थापन केला असून नगर मध्ये दिंडीचे स्वागत डॉ. प्रकाश जाधव, एम बी धुमाळ करणार आहेत. ज्यांना या दिंडी सोहळ्यात सहभागी व्हायचे त्यांनी गोरक्षनाथ गडावर १४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता हजर राहावे, दिंडीत वारकऱ्यांनी पांढरा पोशाख परिधान करावा व शिस्त पाळावी, सहभागी होणाऱ्या वारकरी भक्तांनी आरोग्य तपासणी करून घ्यावी असे आवाहन अध्यक्ष भाऊसाहेब हरिश्चन्द्रे, सचिव राधाकिसन गांधले, उपाध्यक्ष सुभाष फुलारे, सहसचिव संभाजी गडाख, गोरक्षनाथ गड देवस्थानचे अध्यक्ष ॲड. शंकरराव कदम यांनी केले आहे

अधिक माहितीसाठी संपर्क राम महाराज पोते ९८८१४४५८९२, किशोर महाराज गडाख ९९६०४७९९०९, डॉ.प्रकाश जाधव ९५५२०९३२२९, योगेश झिने ९५९५२१५५५५, नामदेव आव्हाड ९२२६३४८१५८, सिमाजी तांबे ९७६७४९३३७५, भगवान ढोकणे ७२७६८०१३३५ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# धनगर समाजाच्या मेळाव्यामधून 'एकजुटीचा निर्धार'; पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवींच्या विचारांचा जागर

### विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मान; यशवंत सेना व जय मल्हार शैक्षणिक संस्थेचा उपक्रम



लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित मेळाव्यात प्रशासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, उद्योजक आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

नगर – यशवंत सेना, अहिल्यानगर आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने धनगर समाजाचा मेळावा उत्साहात पार पडला. पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या या मेळाव्यात अहिल्यादेवी होळकर यांच्या आदर्श राज्यकारभार, न्यायप्रियता, लोककल्याणकारी धोरणे आणि समाजसेवेच्या कार्याचा जागर करून उपस्थितांना प्रेरित करण्यात आले.

शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य तुळशिराम भोजने होते. यावेळी मच्छिंद्र बिडगर, शर्मिला नलावडे, यशवंत सेनेचे शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर, नाना डोंगरे, भीमराव जाधव, मुख्याध्यापक अशोक सूर्यवंशी, पुणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त रेश्मा पुणेकर, विठ्ठल दातीर, पोपट मतकर, अनिल भदर्गे (जालना), ज्ञानेश्वर कांबळे, अजय जाडकर, सुनिता आदमाने उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रशासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, उद्योजक आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. पुरस्कारप्राप्तांचा विविध क्षेत्रातील कार्याचा गौरव करण्यात आला.

प्रास्ताविकात संयोजक कांतीलाल जाडकर म्हणाले, धनगर समाज हा परंपरेने कष्टकरी, स्वाभिमानी आणि राष्ट्रनिष्ठ समाज आहे. मात्र आजच्या स्पर्धेच्या युगात समाजाने शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि आधुनिक तंत्रज्ञान या क्षेत्रांत अधिक सक्षमपणे पुढे जाण्याची गरज आहे. समाजातील मतभेद विसरून एकत्र येणे, युवकांना दिशा देणे आणि गुणवंतांचा सन्मान करणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे. लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे विचार आणि कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या आदर्शातून समाजात सेवा, समर्पण आणि नेतृत्वाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने हा मेळावा घेतल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य तुळशिराम भोजने म्हणाले की, समाजाच्या विकासाचा पाया हा शिक्षणात आहे. समाजातील प्रत्येक मुलगा आणि मुलगी उच्च शिक्षित झाली, तर समाजाची प्रगती आपोआप होईल. धनगर समाजाने शिक्षण, संघटन आणि सामाजिक बांधिलकी या तीन सूत्रांवर पुढे वाटचाल केली तर समाजाची प्रगती निश्चित होईल. लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांनी राज्यकारभार करताना शिक्षण, न्याय, धर्मनिरपेक्षता, स्त्री सक्षमीकरण आणि लोककल्याण यांचा आदर्श घालून दिला. त्यांच्या कार्याचा अभ्यास करून आजच्या पिढीने समाजसेवेची प्रेरणा घ्यावी. समाजातील गुणवंतांचा सन्मान हा इतरांसाठी प्रेरणादायी ठरतो आणि त्यातून नवे नेतृत्व घडत असल्याचे त्यांनी सांगितले.

मेळाव्यात इतिहासाचे अभ्यासक प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ यांनी लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य, राज्यकारभार आणि सामाजिक योगदान या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. त्यांनी अहिल्यादेवींनी उभारलेली मंदिरे, घाट, धर्मशाळा, न्यायव्यवस्था, लोकाभिमुख प्रशासन आणि स्त्री नेतृत्वाचा आदर्श यावर प्रकाश टाकत त्यांच्या कार्याचे ऐतिहासिक महत्त्व विशद केले. त्यांच्या विचारांचे आजच्या समाजजीवनातही मोठे महत्त्व असल्याचे त्यांनी नमूद केले. सूत्रसंचालन अनंत द्रविड यांनी केले, तर ज्येष्ठ समाजसेवक विठ्ठल दातीर यांनी आभार मानले.

# ‘आयकॉन फ्लेजलिंग्स’च्या चिमुरड्यांनी मातांसह फायरलेस कुकिंगमधून जोपासली सर्जनशीलता

नगर – द आयकॉन पब्लिक स्कूलच्या फ्लेजलिंग्स विभागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या मातांसोबत फायरलेस कुकिंग उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थी आणि त्यांच्या मातांना एकत्र शिकण्याची, सर्जनशीलतेला वाव देण्याची संधी मिळाली. घरी आई मुलांसाठी स्वयंपाक करत असते. शाळेतील या उपक्रमात मुलांना आईसह आनंददायी वातावरणात स्वयंपाक करण्याचा अनुभव मिळाला.



द आयकॉन पब्लिक स्कूलच्या फ्लेजलिंग्स विभागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या मातांसोबत फायरलेस कुकिंग उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी आपल्या मातांसह गॅस किंवा अग्नी साधनांचा वापर न करता विविध पौष्टिक व आरोग्यदायी खाद्यपदार्थ तयार करत सकस आहाराचे महत्त्व अनुभवले. प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, संघभावना, जबाबदारीची जाणीव आणि आत्मविश्वास वृद्धिंगत झाला.

या उपक्रमाचा उद्देश केवळ स्वादिष्ट पदार्थ तयार करणे एवढाच नव्हता, तर विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह समृद्ध करणे, अन्नातील पोषणमूल्यांची जाणीव करून देणे, सहाध्यायांसोबत पदार्थ वाटून घेण्याची सवय विकसित करणे आणि अन्नाच्या माध्यमातून परस्परांतील स्नेह अधिक दृढ करणे होता. मातांनीही उत्साहाने सहभाग घेत आकर्षक, पौष्टिक आणि नाविन्यपूर्ण पदार्थ सादर करून उपक्रमाला प्रतिसाद देऊन शाळेचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे सादरीकरण आत्मविश्वासाने केले तसेच त्यातील पोषणमूल्यांची माहितीही दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सादरीकरण कौशल्यासह संवादकौशल्य आणि सहकार्याची भावनाही अधिक बळकट झाली.

हा उपक्रम द आयकॉन पब्लिक स्कूलच्या शैक्षणिक गुणवत्ता, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाप्रती असलेल्या कटिबद्धतेची साक्ष देणारा ठरला.

या प्रसंगी शाळेच्या पॅट्रन मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, डायरेक्टर ॲडमिनिस्ट्रेशन कर्नल आर. सी. राणा, ट्रस्टी निर्मल मुथा व अमित मुथा यांनी उपक्रमाच्या आयोजनाबद्दल शिक्षक, माता व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### आर. आर. केबल फाउंडेशन व निरंजन सेवाभावी संस्थेतर्फे

# ‘समर्थ प्रशाला व श्री मार्कंडेय विद्यालयास’ अत्याधुनिक वॉटर प्युरिफायर जलकुंभ भेट

नगर – आर. आर. केबल फाउंडेशन व निरंजन सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सावेडी येथील समर्थ प्रशाला व श्रमिकनगर येथील मार्कंडेय विद्यालयाला अत्याधुनिक वॉटर प्युरिफायर जलकुंभ भेट देत नव्याने उभारण्यात आलेल्या जलकुंभाचा नळ सुरू करून लोकार्पण करण्यात आले.



आर. आर. केबल फाउंडेशन व निरंजन सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सावेडी येथील समर्थ प्रशाला व श्रमिकनगर येथील मार्कंडेय विद्यालय यांना अत्याधुनिक वॉटर प्युरिफायर जलकुंभ भेट देण्यात आले.

आर आर केबल लिमिटेड चे सी एस आर फंड मॅनेजर वेन्सी डाबरे यांनी सांगितले की, शुद्ध पिण्याचे पाणी हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत अधिकार आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे, आणि समाजात निरोगी पिढी घडावी, या उद्देशाने आमची ही जलमोहीम सुरू आहे. भविष्यातही अशा अनेक शैक्षणिक संस्थांपर्यंत ही सेवा पोहोचविण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.

निरंजन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयेश कासट म्हणाले कि आपण दिलेला जलकुंभ हा योग्य ठिकाणी देण्यात आला याचा आनंद वाटतो असे उदगार काढले

या कार्यक्रमास निरंजन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयेश कासट, अतुल डागा, स्वप्निल कुलकर्णी, मुकुंद धूत, धिरज भाटिया, किरण मनियार, सुमित चांडक, राहुल झवर, श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, सचिव सुरेश क्षीरसागर, ॲड. किशोर देशपांडे, सुनील जोशी, प्राचार्या वसुधा जोशी, मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर, पर्यवेक्षक के. एम. कुलकर्णी तसेच पद्मशाली विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोक सब्बन, सचिव विनायक गुडेवार, शालेय समिती प्राथ. चे अध्यक्ष प्रा. बाळकृष्ण सिद्धम, शालेय समिती माध्य. चे अध्यक्ष शंकरराव येमूल, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

समर्थच्या प्राचार्या सौ.जोशी यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून दिलेला हा जलकुंभ आमच्यासाठी अमूल्य ठेवा आहे. आपल्या संस्थांची सामाजिक जाणीव, दानशूर वृत्ती आणि शिक्षण क्षेत्राबद्दलची सकारात्मक भूमिका अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यामुळे भविष्यात शाळेसाठी अत्यावश्यक असलेल्या इंटरॅक्टिव्ह पॅनेलसाठीही सीएसआर निधीतून सहकार्य करण्याचा आपण निश्चितच सकारात्मक विचार कराल, अशी आमच्या संपूर्ण शाळा परिवारातर्फे अपेक्षा आहे.

प्रास्तविक मुख्याध्यापक शशिकांत गोरे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले. मार्कंडेय प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुरकुटला सुलभा यांनी आभार व्यक्त केले.

# ‘लोकमाता अहिल्यादेवी होळकर पुरस्कारा’ने अहिल्यानगर येथील सुदाम ढेमरे सन्मानित

नगर – यशवंत सेना, अहिल्यानगर आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत शाहु फुले आंबेडकर साठे कलाम सामाजीक विचार मंचाचे सुदाम साहेबराव ढेमरे यांना लोकमाता अहिल्यादेवी होळकर समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले.



सुदाम ढेमरे यांना लोकमाता अहिल्यादेवी होळकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त आयोजित धनगर समाजाच्या मेळाव्यात ढेमरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आमदार संग्राम जगताप यांची प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी प्राचार्य तुळशिराम भोजने, यशवंत सेनेचे शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर, सरचिटणीस अजय जाडकर, शाहू, फुले, आंबेडकर, साठे, कलाम सामाजिक विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे, जिल्हाध्यक्ष प्रदीप ससाणे, मच्छिंद्र बिडगर, शर्मिला नलावडे, पै. नाना डोंगरे, पुणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त रेश्मा पुणेकर, डॉ. सुनील सकट आदींसह उपस्थित होते.

सुदाम ढेमरे शाहु फुले आंबेडकर साठे कलाम सामाजीक विचार मंचच्या माध्यमातून सामाजिक कार्य करत आहे. समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी व विविध प्रकारे शासकीय लाभ मिळवून देण्यासाठी ते सातत्याने योगदान आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन सदर पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

# मखदुम सोसायटीतर्फे मोफत वह्या वाटप

### विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन आपल्या आई-वडिल व शिक्षकांचे स्वप्नपूर्ती करावी : तनवीर चष्मावाला

नगर – शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क आहे आणि त्या शिक्षणाच्या प्रवासात छोटासा हातभार लावण्याचा हा आमचा प्रयत्न आहे.

दानशूर व्यक्तींच्या सामाजिक बांधिलकीमुळे हा उपक्रम यशस्वी झाला आहे. या वह्या केवळ लिहिण्यासाठी नाहीत, तर तुमची स्वप्ने, ध्येय आणि उज्ज्वल भविष्य घडविण्याचे साधन आहेत. मन लावून अभ्यास करा, चांगले संस्कार जोपासा आणि आपल्या आई-वडिलांचे, शिक्षकांचे व समाजाचे नाव उज्ज्वल करा, असे प्रतिपादन तनवीर चष्मावाला यांनी केले.



मखदुम सोसायटीतर्फे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आले.

मखदुम सोसायटी तर्फे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनई नं.४ येथील विद्यार्थ्यांना डॉ. दमण काशिद, डॉ. अश्फाक पटेल, राजकुमार गुरनानी आदिंच्या सहकार्याने वहया वाटप करण्यात आले. यावेळी मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, तनवीर चष्मावाला, शिक्षिका शेख नाजेमा बेगम नवाब उपस्थित होते.

शिक्षिका शेख नाजेमा यांनी आभार मानले.



रोटरी क्लब सेंट्रलच्या अध्यक्षपदी अमर गुरप व सेक्रेटरीपदी सुनिल मुथा यांची निवड झाल्याबद्दल कॉलेज मित्र परिवारातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

# सामाजिक भान जीवन व्यापक बनवते

### किशोर गांधी यांचे प्रतिपादन

नगर – सामाजिक भान कायम ठेवून कार्य करणारे समाजहितैषी अनेकांचे जीवन विशाल, व्यापक बनवतात. यातून जगाचे भले होते. त्यामुळेच रोटरी क्लब सारख्या संघटनांचे जागतिक पातळीवरील कार्य अनुकरणीय व आदर्शवत आहे. रोटरी क्लबच्या नेतृत्वपदी आमच्या मित्रांची निवड अभिमानास्पद व आनंददायी आहे, असे प्रतिपादन किशोर गांधी यांनी केले.

रोटरी क्लब सेंट्रलच्या अध्यक्षपदी अमर गुरप व सेक्रेटरीपदी सुनिल मुथा यांची निवड झाल्याबद्दल कॉलेज मित्र परिवारातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

कॉलेज जीवनानंतर करिअर झाले, निवृत्त झालो. आता आयुष्याच्या नवीन इनिंगमध्ये दायित्व समजून समाजाला परत काही देण्याचा प्रयत्न करणे हा हेतू चांगला आहे. आमची बहुतेक मित्र मंडळी आयुष्यात सफल होऊन सामाजिक कार्यात योगदान देत आहेत हे अभिमानास्पद आहे. अमर गुरप हे युनायटेड इन्शुरन्स येथे शाखाधिकारी होते. तर सुनील मुथा हे अहमदनगर मर्चंटस बँकेत शाखाधिकारी होते, असेही गांधी यांनी सांगितले.

’कॉलेज कट्टा ८६’ च्या वतीने उभयंतांचा सत्कार करण्यात आला. रोटरी सेंट्रलचे नूतन अध्यक्ष अमर गुरप यांनी रोटरी क्लबच्या कार्याची माहिती दिली. नगर शहरात क्लबच्या ६ शाखा असून पूर्ण जगभरात ३६ हजार पेक्षा जास्त शाखा आहेत. नगर सेंट्रलच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, सामाजिक प्रकल्प इत्यादी माध्यमांतून दुर्लक्षित, वंचित, उपेक्षित वर्गाला सहकार्य करण्याचा प्रयत्न असतो, असे गुरप यांनी सांगितले.

यावेळी सुनील मुथा, ज्ञानेश्वर दुधाडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी शिवाजी संदुपटला, विलास लगड, दत्तात्रय मुत्त्याल, मुकुंद खांदवे, नरेंद्र दिकोंडा आदी उपस्थित होते.

मित्र परिवाराच्या या अनौपचारिक कार्यक्रमात राजेंद्र शिंदे यांनी आभार मानले.

# अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी ट्रेनसाठी जनआंदोलनाची हाक

### २५ हजार प्रवाशांचा एकच आवाज, एकच मागणी; ५ हजार व्हिडिओंद्वारे मांडणार जनतेची भूमिका

नगर – अहिल्यानगर-पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांच्या दैनंदिन समस्यांना कायमस्वरूपी तोडगा मिळावा आणि या मार्गावर स्वतंत्र इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू व्हावी, या प्रमुख उद्देशाने अहमदनगर जिल्हा प्रवासी संघटना यांच्या वतीने मिशन २५००० प्रवासी अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी जनआंदोलन या लोकचळवळीचा प्रारंभ करण्यात आला आहे. हे आंदोलन पूर्णपणे नागरिकांच्या सहभागातून, पक्षनिरपेक्ष आणि लोकहिताच्या भावनेतून उभारण्यात येत असल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.



अहिल्यानगर आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांदरम्यान दररोज हजारो विद्यार्थी, नोकरदार, उद्योजक, औद्योगिक कर्मचारी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध आजारांवर उपचारासाठी जाणारे रुग्ण प्रवास करतात. मात्र वाढती वाहतूक कोंडी, वेळेचा होणारा मोठा अपव्यय, वाढलेला इंधन व प्रवास खर्च, खासगी वाहनांवरील अवलंबित्व आणि सार्वजनिक वाहतुकीतील अपुऱ्या सुविधा यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अनेक वर्षांपासून अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी ट्रेनची मागणी सातत्याने होत असली, तरी अद्याप या मागणीची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे आता नागरिकांच्या थेट सहभागातून शासन आणि भारतीय रेल्वेचे लक्ष वेधण्यासाठी मिशन २५००० प्रवासी ही जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. या अभियानात जिल्ह्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रांतील संस्था व संघटनांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. औद्योगिक संघटना, एमआयडीसीतील उद्योग समूह, चेंबर ऑफ कॉमर्स, व्यापारी संघटना, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे, रुग्णालये, वैद्यकीय संघटना, डॉक्टर व वकील संघटना, स्वयंसेवी संस्था, लायन्स क्लब, रोटरी क्लब, युवक व महिला संघटना, ज्येष्ठ नागरिक संघटना, शेतकरी संघटना, प्रवासी संघटना, गृहनिर्माण संस्था तसेच प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांच्या प्रतिनिधींनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या जनआंदोलनाचा पुढील महत्त्वाचा टप्पा माझा प्रवास... माझा संघर्ष या डिजिटल मोहिमेच्या स्वरूपात राबविण्यात येणार आहे. ५ जुलै पासून अहिल्यानगर-पुणे मार्गावरील प्रत्येक नियमित प्रवाशाने केवळ ३० सेकंदांचा व्हिडिओ तयार करून सोशल मीडियावर शेअर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या व्हिडिओमध्ये प्रवाशांनी आपण अहिल्यानगर-पुणे प्रवास का करतो, दररोज किती वेळ वाया जातो, महिन्याला प्रवासावर किती खर्च होतो आणि इंटरसिटी ट्रेन सुरू झाल्यास आपल्या आयुष्यात काय सकारात्मक बदल होईल, याविषयी आपले मनोगत व्यक्त करायचे आहे. हे व्हिडिओ फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स आणि युट्यूब या सोशल माध्यमांवर मिशन २५०००, नगरपुणेइंटरसिटी, मायजर्नीमायस्ट्रगल, ट्रेनफॉरपिपल आणि अहिल्यानगरटूपुणे या हॅशटॅगसह शेअर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या अभियानातून किमान पाच हजार प्रवाशांचे व्हिडिओ एकत्र करून शासन आणि भारतीय रेल्वेसमोर या मार्गावरील प्रवाशांची एकसंघ, ठोस आणि प्रभावी भूमिका मांडण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, ही केवळ एका रेल्वेची मागणी नसून वेळेची बचत, सुरक्षित प्रवास, विद्यार्थ्यांचे शिक्षण, रोजगाराच्या संधी, उद्योग-व्यवसायाची वाढ आणि अहिल्यानगरच्या सर्वांगीण विकासासाठी उभारलेले व्यापक लोकआंदोलन आहे. या आंदोलनात प्रत्येक नागरिकाचा सहभाग लाभणे आवश्यक आहे.

या अभियानासाठी अर्शद शेख, संदेश रापारिया, विपुल शाह, सुनील छाजेड, अजय दिघे, संतोष बडे, सुनील थोरात, संजय चव्हाण, संजय वाळुंज आदींसह अनेक मान्यवरांनी पुढाकार घेतला असून, जिल्ह्यातील सर्व सामाजिक संस्था, औद्योगिक संघटना, व्यापारी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दैनिक प्रवाशांनी या लोकचळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या जनआंदोलनाच्या अधिक माहितीसाठी हरजीतसिंह वधवा (९४२३१६२७२७), प्रशांत मुनोत (९४२२२२९६९९), संजय सपकाळ (९८९०२२८९६४) आणि अशोक कानडे (९८२२०९३६३६) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. चला... २५ हजार प्रवाशांचा आवाज एकत्र करूया आणि अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी ट्रेनचे स्वप्न प्रत्यक्षात आणूया, असा निर्धार व्यक्त करत या जनआंदोलनाला सर्व स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद देण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जिल्हा नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी संध्याताई सोनवणे यांची निवड

नगर – महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने जिल्हा नियोजन समितीवरील नामनिर्देशित सदस्य तसेच विशेष निमंत्रित सदस्यांची घोषणा केली असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) युवती प्रदेशाध्यक्ष संध्याताई उद्धव सोनवणे यांची जिल्हा नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



महाराष्ट्र शासनाच्या ६ जुलै रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार ही नियुक्ती करण्यात आली असून, जिल्हा नियोजनाच्या विविध विषयांतील अनुभव व सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना ही महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

संध्याताई सोनवणे या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) युवती प्रदेशाध्यक्ष म्हणून राज्यभर कार्यरत असून, महिला सक्षमीकरण, सामाजिक प्रश्न, ग्रामीण विकास आणि विविध लोकहिताच्या विषयांवर त्यांनी सातत्याने सक्रिय भूमिका बजावली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्याच्या विकास नियोजनात महिला प्रतिनिधित्व अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# जिल्हा नियोजन समिती सदस्यपदी विनायकराव देशमुख यांची नियुक्ती

नगर – अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीवर विनायक देशमुख यांची नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने शासन निर्णय क्रमांक डीएपी – २०२५/ प्र.क्र.५९(ई ११९७५१०) का– १४८१ –अ ६ जुलैच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली.



श्री. देशमुख हे सध्या भारतीय जनता पक्षाचे जिल्हा समन्वयक असुन जिल्हा कौशल्य विकास समितीचे कार्यकारी सदस्य म्हणून कार्यरत आहेत. श्री. देशमुख यांना जिल्हा नियोजनाच्या विशेष अनुभव असुन २०१० साली तयार करण्यात आलेल्या व्हिजन:२०२० या विकास आराखड्याचे जिल्हा समन्वयक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली होती.

जिल्हा नियोजन समितीच्या नामनिर्देशित सदस्यपदी जिल्ह्यातील संसद सदस्य व विधिमंडळ सदस्यांमधुन दोघांची निवड केली जाते. या तरतुदी नुसार नेवाशाचे आमदार विठ्ठलराव लंघे व संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर जिल्हा नियोजनाचे ज्ञान असलेले सदस्य म्हणून श्री. देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शिफारशीनुसार व अर्थ व नियोजन मंत्री यांच्या मान्यतेने या नियुक्त्या केल्या जातात. तत्कालीन अर्थ व नियोजन मंत्री अजित यांच्या दुर्दैवी निधनामुळे या नियुक्त्या प्रलंबित राहिल्या होत्या. सध्या अर्थ व नियोजन विभागाचा पदभार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असुन त्यांच्या मान्यतेने या नियुक्त्या करण्यात आल्या.

# ‘विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ मोहिमेअंतर्गत’ उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांचा पुढाकार

### स्वतःचे गणना प्रपत्र भरून केले डिजिटायझेशन; नागरिकांनाही विहित मुदतीत प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन

नगर – भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण –२०२६ मोहिमेअंतर्गत अहिल्यानगरचे उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक नोंदणी अधिकारी सुधीर पाटील यांनी स्वतःचे गणना प्रपत्र भरून त्याचे डिजिटायझेशन पूर्ण केले. मतदार पुनरीक्षण प्रक्रियेत स्वतः सक्रिय सहभाग नोंदवून त्यांनी नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला.




तहसील कार्यालयात सुधीर पाटील यांनी स्वतः भरलेले गणना प्रपत्र संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर केले.

तहसील कार्यालयात श्री. पाटील यांनी स्वतः भरलेले गणना प्रपत्र संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर केले. यावेळी महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी श्री. पाटील म्हणाले की, मतदार यादी अचूक, अद्ययावत व त्रुटिरहित ठेवण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराने आपले गणना प्रपत्र विहित मुदतीत भरून त्याचे डिजिटायझेशन करून घेणे आवश्यक आहे. नागरिकांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना आवश्यक सहकार्य करून ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी.

तसेच, कुटुंबातील सर्व पात्र मतदारांनी आपापली गणना प्रपत्रे भरून त्यांचे डिजिटायझेशन पूर्ण करावे व लोकशाही बळकट करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

# चटकदार चिली बेबीकॉर्न



झटपट रेसिपी

मित्रांनो, पावसाळ्यात काही तरी चमचमीत, चटकदार खावंसं वाटतं. त्याच त्या भाज्या खाऊन कंटाळाही येतो. अशा वेळी तुम्ही मस्तपैकी चिली बेबीकॉर्न बनवू शकता. वेगळी भाजी म्हणून चिली बेबीकॉर्न ट्राय करता येईल.

**सामग्री:** बेबीकॉर्न, दोन हिरव्या मिरच्या, एक कांदा, एक मध्यम आकाराची भोपळी मिरची, पाव छोटा चमचा हळद, अर्धा छोटा चमचा लाल तिखट, चमचाभर जिरेपूड, पाव चमचा मिरपूड, पाव चमचा गरम मसाला, दोन चमचे तेल, चवीनुसार मीठ

**कृती:** बेबी कॉर्न स्वच्छ धुवून तुमच्या आवडीच्या आकारात कापून घ्या. कांदा बारीक चिरून घ्या. भोपळ्या मिरचीचे थोडे लांबट तुकडे करा. आता कढईत तेल गरम करून घ्या. त्यात कांदा परतून घ्या. त्यात बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, भोपळी मिरची, हळद, तिखट, जिरेपूड, मिरपूड, गरम मसाला घालून नीट हलवून घ्या. मग चवीनुसार मीठ घाला. या मसाल्यात बेबीकॉर्न घालून नीट हलवून घ्या. मसाला सर्व बेबीकॉर्नला लागायला हवा. आता बेबीकॉर्न मंद आचेवर चार ते पाच मिनिटं शिजवून घ्या. गॅस बंद करा. चिली बेबीकॉर्न तयार आहे. कोथिंबिरीने सजावट करा. हा प्रकार तुम्ही फ्राईड राईस किंवा कोणत्याही भातासोबत खाऊ शकता.




# उभारला तीनशे कोटींचा ब्रँड

अचिव्हर

शुभम कोणत्याही प्रतिष्ठित महाविद्यालयात शिकला नाही किंवा त्याच्याकडे पदव्याही नाहीत. त्याचा प्रवास म्हणजे संघर्षातून यशाकडे जाण्याचे एक उत्तम उदाहरण आहे. शुभमने ' बॉन्कर्स कॉर्नर ' नावाचा एक यशस्वी स्ट्रीटवेअर ब्रँड उभा केला आहे. हा ब्रँड जेन झी ग्राहकांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहे. या ब्रँडची उलाढाल तीनशे कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे; मात्र इथपर्यंतचा त्याचा प्रवास सोपा नव्हता आणि त्याला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला.

शुभम गुप्ताचा जन्म मुंबईतील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याचे वडील कापडाचा व्यवसाय चालवत होते. अनेक वर्षे हे कुटुंब आरामात जगत होते; पण २०११ मध्ये सर्व काही पूर्णपणे बदलले. शुभमने नुकतीच १२वी पूर्ण केली होती आणि तो महाविद्यालयात जाण्याची तयारी करत होता, तेव्हाच त्याच्या वडिलांचा व्यवसाय बुडाला आणि कुटुंब दिवाळखोर झाले. रातोरात त्याची आर्थिक स्थिरता नाहीशी झाली. उच्च शिक्षण हे एक अशक्य स्वप्न बनले. पर्याय मर्यादित असूनही, शुभमने हार मानली नाही. त्याऐवजी, त्याने स्वतःचा आणि आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याचे ठरवले. त्याने छोटी–मोठी कामे केली. याच काळात, त्याच्या लक्षात आले की तरुणांमध्ये स्ट्रीटवेअर फॅशन, विशेषतः ग्राफिक टी–शर्ट्स आणि हटके कॅज्युअल स्टाईलमध्ये आवड वाढत आहे. संधी ओळखून, शुभमने आपल्या तुटपुंज्या बचतीतून स्थानिक बाजारातून साधे टी–शर्ट्स विकत घेतले आणि नंतर ते स्वतः विकायला सुरुवात केली. एक छोटासा जोडधंदा म्हणून सुरू झालेला हा व्यवसाय लवकरच एका मोठ्या व्यवसायात बदलला.

२०१४ मध्ये, शुभम गुप्ताने 'बॉन्कर्स कॉर्नर' अधिकृतपणे सुरू केला. जेन झी ग्राहकांची धाडसी आणि निर्भीड शैली दर्शवणारे परवडणारे स्ट्रीटवेअर तयार करणे, ही त्याची दूरदृष्टी होती. आंतरराष्ट्रीय ट्रेंड्सची नक्कल करणाऱ्या अनेक ब्रँड्सच्या विपरीत, शुभमने भारतीय युवा संस्कृतीशी जोडलेली स्वतःची ओळख निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले. कोणतीही मोठी गुंतवणूक किंवा मार्केटिंग बजेटशिवाय, त्याने एका वेळी एक ऑर्डर घेत हळूहळू ब्रँड वाढवला. एक विशिष्ट स्ट्रीट–स्टाईल लूक कायम ठेवत, परवडणाऱ्या किमतीत दर्जेदार उत्पादने देण्यावर त्याचे धोरण केंद्रित होते.



'शार्क टँक इंडिया'मध्ये सहभागी झाल्यावर शुभम गुप्ताच्या उद्योजकतेच्या प्रवासाकडे अधिक लक्ष वेधले गेले. तोपर्यंत, 'बॉन्कर्स कॉर्नर'चा महसूल शंभर कोटी रुपयांचा टप्पा ओलांडून १४० कोटींच्या जवळ पोहोचला होता. टीव्ही शोमधील ब्रँड पिचदरम्यान, शुभम गुप्ताने सांगितले, की कंपनीचे मूल्यांकन सुमारे तीनशे कोटी रुपये होते. यामुळे अनुपम मित्तल आणि नमिता थापर यांच्यासह अनेक गुंतवणूकदारांना आश्चर्य वाटले.

टेक्नो टॉक

## स्वदेशी बनावटीचा सर्व्हर लाँच



झोहो कॉर्पोरेशनने 'नाथू–ला' हा स्वदेशी बनावटीचा सर्व्हर लॉन्च केला आहे. यासोबतच 'झोहो'ने 'डेटा हार्डवेअर' क्षेत्रातही प्रवेश केला आहे. इंटेल झिऑन ६ प्रोसेसरवर आधारित असलेल्या या सर्व्हरची रचना कंपनीने स्वतः विकसित केली आहे. महत्त्वाचे म्हणजे या प्रकल्पासाठी आवश्यक संशोधन आणि विकासाचे काम मंगेश सदाफळे यांच्या नेतृत्वात नागपुरातील स्थानिक अभियंते आणि प्रशिक्षित तरुणांच्या टीमने केल्याची माहिती आहे. २०२० मध्ये स्थापन करण्यात आलेल्या छोट्या टीमने पाच वर्षांच्या संशोधनानंतर हा सर्व्हर विकसित केला आहे.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, 'नाथू–ला' सर्व्हरमुळे 'डेटा सेंटर'मधील वीज वापर १२ ते १८ टक्क्यांनी कमी होऊ शकतो. त्यामुळे एकूण खर्चात २० ते ३० टक्के बचत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित सेवांचा खर्चही कमी होण्यास मदत होणार आहे. 'झोहो कॉर्प'चे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश डेव्ही यांनी सांगितले, की भारतात डिझाइन केलेली ही सर्व्हर प्रणाली देशाच्या तांत्रिक सार्वभौमत्वाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. या सर्व्हरमधील सर्व भाग 'झोहो'च्या हार्डवेअर टीमने इन–हाउस विकसित केले आहेत.

दरम्यान, हे सर्व भाग भारतीय इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांच्या सहकार्याने करण्यात आले आहे. अत्याधुनिक थर्मल व्यवस्थापन आणि खर्च कमी करणाऱ्या सर्व्हर डिझाइनसाठी कंपनीने पाचहून अधिक पेटंट्सही दाखल केले आहेत.

# जास्त टीव्ही बघताय ?



फिटनेस फंडा

बैठी जीवनशैली आरोग्याला घातक असते हे आपण जाणतो. बैठं काम करणाऱ्यांना हृदयविकार, उच्च रक्तदाब, मधुमेह, स्थूलपणा असे विकार जडू शकतात. आपण फिटनेसबाबत दक्ष असलो तरी बैठ्या कामाबाबत काहीच करता येत नाही. तासनतास ऑफिसमध्ये बसून काम करण्याशिवाय आपल्याकडे पर्यायच नसतो. पण दोस्तांनो, ऑफिसमधल्या बैठ्या कामापेक्षाही घातक अशी एक सवय आहे. ती म्हणजे सतत टीव्हीपुढे बसणं. अनेकजण काही तास टीव्हीपुढे बसून असतात. ते एक क्षणही हलत नाहीत. पण या सवयीने तुमचं नुकसान होऊ शकतं.

अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या जर्नलमध्ये याबाबतचं एक संशोधन प्रसिद्ध झालं आहे. या संशोधनासाठी ३५९२ लोकांच्या जीवनशैलीचा अभ्यास करण्यात आला. दररोज चार तासांपेक्षा जास्त काळ टीव्ही बघणाऱ्यांना दिवसाला दोन तास टीव्ही बघणाऱ्यांच्या तुलनेत हृदयविकार आणि अकाली मृत्यूचा धोका ५० टक्के अधिक असल्याची बाब यातून समोर आली. ऑफिसमध्ये बसून काम करण्यापेक्षा ही सवय अधिक घातक असल्याचा निष्कर्ष यातून काढण्यात आला.

दिवसभर काम करून घरी आल्यानंतर आपण टीव्हीपुढे बसतो. रात्रीच्या निवांत वेळी आपण जरा जास्तच जेवतो. जेवल्यानंतर काही तास बसून राहिल्याचे आरोग्यावर दुष्परिणाम होऊ शकतात. त्यातच झोपायला जाईपर्यंत अनेकजण जागचे हलत नाहीत. टीव्ही बघताना वेफर्स, बिस्किटं असे पदार्थ आपण खातो. ऑफिसमध्ये आपण बसून असलो तरी सहकाऱ्यांशी गप्पा मारण्यासाठी, मीटिंगच्या निमित्ताने आपण उठतो. पण टीव्ही बघताना तसं होत नाही. त्यामुळे धोका वाढतो. टीव्ही बघणं आणि हृदयविकार यांचा थेट संबंध यातून दिसून आला नसला तरी टीव्ही बघण्याचे तास कमी करणं गरजेचं आहे. तसंच सतत टीव्ही बघण्याऐवजी काही छंद जोपासता येतील.

# शांत, सुंदर आणि थंड ठिकाण

भटकंती


जूनमध्ये बहुतेक पर्यटक उत्तर भारतातील थंड हवेच्या ठिकाणांकडे वळतात; मात्र निसर्गाच्या सान्निध्यात निवांत वेळ घालवायचा आहे, अशा लोकांसाठी तामिळनाडूतील वाल्पराई हा उत्तम पर्याय आहे. दक्षिण भारतात अनेक जण उटी किंवा मुन्नारपर्यंतच आपला प्रवास मर्यादित ठेवतात; मात्र वाल्पराई हे अजूनही मोठ्या प्रमाणावरील पर्यटनाच्या प्रभावापासून दूर राहिलेले एक शांत आणि सुंदर ठिकाण आहे.

कोईम्बतूर जिल्ह्यात वसलेल्या या हिल स्टेशनमध्ये चहाचे विस्तीर्ण मळे, दाट जंगल, धुक्याने वेढलेली शिखरे आणि मनाला मोहून टाकणारे शांत वातावरण अनुभवायला मिळते. गर्दीपासून दूर राहून निसर्गाचा खरा आनंद घ्यायचा आहे, अशा लोकांसाठी वाल्पराई हा एक आदर्श पर्याय ठरू शकतो.

पोल्लाची ते वाल्पराई हा प्रवास एक वेगळाच अनुभव देतो. या मार्गावर तब्बल ४० तीव्र हेअरपिन वळणे असून प्रत्येक वळणावर निसर्गाचे नवे रूप पाहायला मिळते. हिरव्यागार टेकड्या, धबधबे, धरणे आणि खोल दऱ्यांचे मनमोहक दृश्य प्रवाशांचे लक्ष वेधून घेतात.

रोड ट्रिप आणि छायाचित्रणाची आवड असलेल्या पर्यटकांसाठी हा मार्ग एखाद्या स्वर्गापेक्षा कमी नाही. प्रत्येक वळणावर बदलणारे निसर्गसौंदर्य कॅमेऱ्यात टिपण्याचा मोह आवरणे कठीण होते.


वाल्पराई हे केवळ निसर्गरम्य ठिकाण नाही, तर समृद्ध जैवविविधतेसाठीही प्रसिद्ध आहे. येथे हत्ती, लायन–टेल्ड मॅकॅक, तसेच ग्रेट हॉर्नबिलसारखे दुर्मिळ वन्यजीव आणि पक्षी पाहायला मिळतात.



परिसरातील दाट जंगले आणि संरक्षित क्षेत्रांमुळे हे ठिकाण निसर्गप्रेमी आणि पक्षी निरीक्षकांसाठी विशेष आकर्षणाचे केंद्र बनले आहे.

टेक वर्ल्ड

## डिव्हाईस ठेवतात गोपनीय क्षणांचे रेकॉर्ड्स




आजच्या डिजिटल युगात आपले आयुष्य स्क्रीनवरच घालवायला सुरुवात झाली आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत बँकिंग, चॅट, ईमेल, कामाची फाइल्स...सर्व काही स्क्रीनवर उघडतं; पण कल्पना आहे का, की तुमचा स्वतःचा डिव्हाइसच तुमच्या या गोपनीय क्षणांचा रेकॉर्ड ठेवत असेल? मायक्रोसॉफ्टने विंडोज ११ कॅपिलॉट + पीसीसाठी 'रिकॉल' नावाचे नवे फीचर सादर केले आहे. हे फीचर तुमच्या संगणकावर दर काही सेकंदांनी स्क्रीनशॉट घेते आणि ते तुमच्या डिव्हाइसवर साठवते. नंतर 'एआय' या सर्व स्क्रीनशॉट्सचे विश्लेषण करून तुम्ही पूर्वी पाहिलेल्या कोणत्याही वेबसाइट, दस्तऐवज किंवा ॲपला क्षणार्धात शोधून देते. सोयीचे वाटते; पण यामागे लपलेला धोका प्रचंड आहे.


सायबरसुरक्षा तज्ज्ञ आणि गोपनीयतेचे पुरस्कर्ते या फीचरला 'डिजिटल जासूस' म्हणत आहेत. तुमचे पासवर्ड, बँक डिटेल्स, खासगी संदेश, वैयक्तिक फोटो किंवा महत्त्वाचे दस्तावेज... सर्वकाही स्क्रीनशॉट्समध्ये कैद होत आहे. हा डेटा चुकून हॅकरच्या हाती लागला किंवा डिव्हाइसने शेअर केला तर काय होईल? ही भीती केवळ सैद्धांतिक नाही, तर वास्तव आहे.

१ टीबी एसएसडी असलेल्या संगणकावरही हे फीचर चालू ठेवल्यास स्टोरेजचा मोठा भाग फक्त स्क्रीनशॉट्ससाठी राखीव राहतो. यामुळे डिव्हाइस मंद होण्याची शक्यताही वाढते. ही समस्या फक्त पीसीपुरती मर्यादित नाही. अँड्रॉइड आणि आयफोनवरील काही ॲक्सेसिबिलिटी फीचर्स आणि थर्ड पार्टी ॲप्सही स्क्रीन कॅप्चर करण्याची क्षमता ठेवतात. काही ॲप्स परवानग्यांचा गैरवापर करून तुमच्या स्क्रीनवर नजर ठेवू शकतात. – **ताबडतोब बंद करा हे फीचर, विंडोज ११ वापरकर्त्यांनी त्वरित या स्टेप उचला, सेटिंग्ज गोपनीयता आणि सुरक्षा रिकॉल आणि स्नॅपशॉट्स, या पद्धतीने रिकॉल फीचर बंद करा.अँड्रॉइडवर ॲक्सेसिबिलिटी परमिशन तपासा आणि आयफोनवर प्रायव्हसी सेटिंग्जमध्ये स्क्रीन रेकॉर्डिंग परवानग्या तपासून घ्या.**

# प्रेम खरंच असतं का?

मॅच मेकिंग

मी २६ वर्षांची तरुणी असून स्वतःच्या पायांवर उभी आहे. मधल्या काळात माझी बरीच ब्रेक अप्स झाली. या ब्रेक अप्सचा माझ्या मनावर खोलवर परिणाम झाला नसला तरी थोडेफार ओरखडे उमटले. पण मध्यंतरी माझं पुन्हा ब्रेक अप झालं. पाच महिन्यांचं नातं मी संपवलं. यामुळे माझा प्रेमावरचा विश्वासच उडाला. पुन्हा काही नाती जोडण्याचा प्रयत्न केला. पण त्यात काही अर्थ नव्हता. मग मी लग्न करायचं ठरवलं. काही मॅट्रिमोनियल ॲप्स डाउनलोड केली. चांगला जोडीदार शोधण्याचा प्रयत्न केला. पण मला अपयश आलं. यामुळे माझा लग्नावरही विश्वास राहिलेला नाही. लोक मला अजून गोंधळात टाकतात. मी काय करू?



**उत्तर** : योग्य जोडीदार शोधण्यात आलेल्या अपयशामुळे तू निराश झाली आहेस. मुळात दोष तुझ्यात नाही पण तुला अजूनही मनाजोगा जोडीदार मिळालेला नाही. अशा परिस्थितीत नैराश्य येणं अगदी स्वाभाविक आहे. प्रत्येक माणसाचं मत वेगळं असू शकतं. प्रत्येकजण आपल्या अनुभवानुसार बोलत असतो. त्यामुळे तू शांत रहा. धीर धर. सुयोग्य जोडीदाराचा शोध घेत रहा.

# 'व्हिस्पर-एआय' तंत्रज्ञान उपयुक्त

ॲप वर्ल्ड

'मला एक ई–मेल लिहायचा आहे.', 'व्हॉट्सॲपवर उत्तर पाठवायचे आहे.', 'लेख लिहायचा आहे.' सध्या या प्रत्येक कामासाठी आपण कीबोर्डवर टाईप करतो. परंतु कल्पना करा, फक्त बोललात आणि तुमचे शब्द लगेच सुबक, व्याकरणदृष्ट्या योग्य आणि व्यवस्थित मजकुरात बदलले गेले तर? हीच क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहे 'व्हिस्पर–एआय.' हे एक अत्याधुनिक 'व्हॉइस टू टेक्स्ट,' 'एआय' साधन आहे. आपण बोलतो ते केवळ शब्दशः लिहून काढणे एवढेच त्याचे काम नाही. आपण बोलताना होणाऱ्या चुका, अपूर्ण वाक्ये, विचार बदलणे यांचा संदर्भ समजून घेऊन ते अधिक नैसर्गिक आणि व्यवस्थित लिखाण तयार करते. म्हणजेच, हे केवळ बोलणे ओळखण्याची प्रक्रिया नसून बोलणे समजून घेण्याची आहे.

संशोधनानुसार, बहुतांश लोक टायपिंगपेक्षा ३ ते ४ पट वेगाने बोलू शकतात. एखादा लेख, अहवाल किंवा ई–मेल लिहिण्यासाठी १५ मिनिटे लागत असतील, तर त्याच गोष्टी बोलून सांगण्यासाठी कदाचित ४ ते ५ मिनिटे पुरतील, म्हणूनच जगभरातील व्यावसायिक, उद्योजक, शिक्षक, लेखक आणि विद्यार्थी अशा साधनांकडे आकर्षित होत आहेत.

**'व्हिस्पर–एआय'ची वैशिष्ट्ये –**

१ नैसर्गिक भाषेची समज– आपण बोलताना अनेकदा वाक्य अर्धवट सोडतो, विचार बदलतो किंवा शब्द चुकवतो. अशा परिस्थितीत 'व्हिस्पर–एआय' संदर्भ समजून अधिक अर्थपूर्ण मजकूर तयार करते. २ अनेक ॲप्समध्ये वापर– ई–मेल, व्हॉट्सॲप, नोट्स, दस्तऐवज किंवा सोशल मीडिया पोस्ट, जिथे टायपिंग करता येते तिथे आवाजाद्वारे मजकूर तयार करण्याची सुविधा. ३ विविध भाषांना सपोर्ट– जगभरातील अनेक भाषांमध्ये वापर करता येतो. भारतीय भाषांमध्येही अशा तंत्रज्ञानाचा वेगाने विस्तार होत आहे. ४ वेळेची बचत– व्यग्र व्यावसायिकांसाठी हे मोठे वरदान ठरू शकते. बैठकीनंतर लगेच निरीक्षणे नोंदवणे किंवा प्रवासात असताना संदेश तयार करणे अधिक सोपे होते. विशेषतः ज्यांना मोठ्या प्रमाणात लेखन करावे लागते त्यांच्यासाठी हे साधन उत्पादकता वाढवणारे ठरू शकते. प्रत्येक नवीन तंत्रज्ञानाप्रमाणे यालाही काही आव्हाने आहेत.

# स्टायलिश दिसण्यासाठी क्लासी कपडे

फॅशन पॅशन

मार्केटमध्ये स्टायलिश दिसण्यासाठी नेहमीच मोठा खर्च करावा लागतो, असे नाही. कमी बजेटमध्येही दर्जेदार, आकर्षक आणि क्लासी कपडे मिळू शकतात. अशा पर्यायांमध्ये अर्बानो फॅशन हा ब्रँड विशेष लोकप्रिय ठरत आहे. या ब्रँडचे कपडे प्रीमियम लूक आणि आरामदायी अनुभव देतात. विविध आकर्षक रंगछटा, आधुनिक डिझाइन आणि उत्तम फिटिंग यामुळे तरुणांपासून व्यावसायिकांपर्यंत सर्वांमध्ये या ब्रँडची पसंती वाढत आहे.

मिंत्रावर अर्बानो फॅशनचे अनेक टी–शर्ट आणि शर्ट ५९९ रुपयांपेक्षा कमी किमतीत उपलब्ध आहेत. त्यामुळे कमी खर्चात आपल्या वॉर्डरोबला आधुनिक आणि स्टायलिश स्वरूप देता येते. कॅज्युअल टी–शर्ट असो किंवा स्मार्ट शर्ट, प्रत्येक प्रसंगासाठी योग्य पर्याय या ब्रँडमध्ये उपलब्ध आहेत.

१. मँडरिन कॉलर कॉटन टी–शर्ट

साधेपणा आणि स्टाइल यांचा सुंदर मिलाफ असलेला हा हिरव्या रंगाचा टी–शर्ट नियमित वापरासाठी उत्तम पर्याय आहे. १०० टक्के कॉटनपासून तयार करण्यात आल्यामुळे तो उन्हाळ्यातही आरामदायी वाटतो. स्लिम–फिट डिझाइनमुळे आधुनिक लूक मिळतो. कॅज्युअल आउटिंग किंवा जॅकेटखाली लेयरिंगसाठीही हा टी–शर्ट योग्य ठरतो.



२. ओव्हरसाइज राउंड नेक टी–शर्ट

सध्या ओव्हरसाइज टी–शर्टचा ट्रेंड मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय आहे. काळ्या रंगातील हा राउंड नेक टी–शर्ट मऊ कॉटन फॅब्रिकपासून तयार करण्यात आला आहे. हलका, आरामदायी आणि स्ट्रीट–स्टाइल लूक देणारा हा पर्याय जीन्स खुलून दिसतो. विविध आकारांमध्ये उपलब्ध असल्यामुळे प्रत्येकासाठी योग्य फिट मिळू शकते.

३. मॉव्ह रंगातील ओव्हरसाइज टी–शर्ट

नेहमीच्या काळ्या, पांढऱ्या किंवा निळ्या रंगांऐवजी काहीतरी वेगळे हवे असल्यास मॉव्ह रंगातील हा टी–शर्ट उत्तम पर्याय आहे.

# पीएच. डी. करणे आता सोपे

उच्च शिक्षण

देशात उच्च शिक्षण आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी, केंद्र सरकार आणि विविध सरकारी संस्था पीएच.डी. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आणि फेलोशिप योजना देतात. या योजनांअंतर्गत दरमहा ३७ हजार रुपये ते एक लाख रुपये किंवा त्याहून अधिक आर्थिक मदत दिली जाते. अनेक योजनांमध्ये संशोधन अनुदान आणि इतर लाभही दिले जातात. पंतप्रधान संशोधन फेलोशिप (पीएमआरएफ) ही प्रामुख्याने आयआयटी, आयआयएससी, आयआयएसईआर आणि इतर नामांकित संस्थांमधील पीएच. डी. विद्यार्थ्यांसाठी आहे.

या योजनेअंतर्गत, संशोधकांना पहिल्या दोन वर्षांसाठी दरमहा ७० हजार रुपये, तिसऱ्या वर्षासाठी दरमहा ७५ हजार रुपये आणि चौथ्या व पाचव्या वर्षासाठी दरमहा ऐंशी हजार रुपयांची फेलोशिप मिळते. या व्यतिरिक्त, पाच वर्षांच्या कालावधीत दहा लाख रुपयापर्यंतचे संशोधन अनुदान दिले जाते. देशात पीएच. डी.साठी निधी मिळवण्याचे सर्वात लोकप्रिय माध्यम म्हणजे यूजीसी–नेट आणि सीएसआयआर–नेट ज्युनियर रिसर्च फेलोशिप (जेआरएफ) आहे. या फेलोशिप विज्ञान, मानविकी, सामाजिक विज्ञान आणि इतर शाखांमधील विद्यार्थ्यांना दिल्या जातात. नेट–जेआरएफमध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधनादरम्यान मासिक विद्यावेतन दिले जाते. ही फेलोशिप साधारणपणे पाच वर्षांची असते. त्यातील सुरुवातीची वर्षे 'जेआरएफ' आणि त्यानंतरची 'एसआरएफ'द्वारे पूर्ण केली जातात. विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाद्वारे (डीएसटी) चालवली जाणारी 'इन्स्पायर फेलोशिप' ही विज्ञान विषयांमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या आणि संशोधन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे. ही फेलोशिप मूलभूत आणि उपयोजित विज्ञानातील संशोधकांना आर्थिक सहाय्य प्रदान करते. प्रतिभावान विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संशोधनाकडे आकर्षित करणे हा याचा उद्देश आहे. 'एआयसीटीई डॉक्टरेट फेलोशिप' (एडीएफ) ही अभियांत्रिकी आणि तांत्रिक क्षेत्रातील पीएच. डी विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेंतर्गत, निवडलेल्या संशोधकांना दरमहा ३७ हजार ते ४२ हजारपर्यंतची फेलोशिप दिली जाते. ही योजना पूर्ण–वेळ पीएच. डी विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधनादरम्यान आर्थिक सहाय्य प्रदान करते, जेणेकरून ते त्यांचे शिक्षण आणि संशोधन अधिक चांगल्या प्रकारे पूर्ण करू शकतील. एखाद्या संशोधकाला उद्योग–संबंधित विषयांवर संशोधन करायचे असेल तर डॉक्टरेट संशोधनासाठीची पंतप्रधान फेलोशिप हा एक चांगला पर्याय असू शकतो. ही योजना सरकार आणि खाजगी उद्योग यांच्यातील भागीदारीवर आधारित आहे. या योजनेंतर्गत, संशोधकांना जेआरएफ आणि एसआरएफ पेक्षा लक्षणीयरीत्या अधिक आर्थिक सहाय्य मिळू शकते. अनेक प्रकरणांमध्ये, फेलोशिपची रक्कम दरमहा एक लाख रुपयांपर्यंत पोहोचू शकते. सरकार अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि इतर मागासलेल्या वर्गातील (ओबीसी) विद्यार्थ्यांसाठी विशेष राष्ट्रीय फेलोशिप योजना देखील चालवते. या योजनांचा उद्देश सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण आणि संशोधनासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. याव्यतिरिक्त, महिलांसाठी 'यूजीसी पोस्ट–डॉक्टोरल फेलोशिप'सारख्या योजना उपलब्ध आहेत, ज्यांचा लाभ पीएच. डी पूर्ण केलेल्या महिला घेऊ शकतात. ही योजना महिला संशोधकांना त्यांचे संशोधन कार्य उच्च स्तरावर सुरू ठेवण्यास मदत करते.



# गावठी कट्टा व जिवंत काडतुसांसह ४ जणांना अटक



नगर – अवैध अग्निशस्त्रे बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांनी सुरू केलेल्या धडक मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीरामपूर शहरात वाकडी रोडवरील यशवंत बाबा चौक परिसरात सापळा रचून चौघांना अटक केली. आरोपींच्या ताब्यातून एका मारुती इर्टिगा गाडी, गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतुसे असा सुमारे ५ लाख ९५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. हा गावठी कट्टा मध्यप्रदेशातून विक्रीसाठी आणल्याचे तपासात समोर आले.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या इसमांची माहिती काढून कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोनि संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि विकास जाधव, पोलीस अंमलदार फुरकान शेख, रिचर्ड गायकवाड, शामसुंदर जाधव, रमिजराजा आतार, भगवान थोरात आणि प्रशांत राठोड यांचे विशेष पथक तयार करून श्रीरामपूर परिसरात रवाना करण्यात आले होते. ६ जुलै रोजी हे पथक श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना, त्यांना माहिती मिळाली की सागर दत्तू उपळकर, विशाल रामकिसन गुंजाळ, ऋतीक गुंजाळ आणि पवन उपळकर हे चार जण एका पांढऱ्या रंगाच्या इर्टिगा गाडीत बेकायदेशीर गावठी कट्टा बाळगून तो विकण्याच्या उद्देशाने वाकडी–श्रीरामपूर रोडने श्रीरामपूरच्या दिशेने येत आहेत. या माहितीवरुन पोलिसांनी वाकडी रोडवरील यशवंत बाबा चौक, विठ्ठल रुक्माई मंदिराजवळ तात्काळ नाकेबंदी करून सापळा लावला.

काही वेळातच माहितीतील इर्टिगा चारचाकी गाडी येताना दिसली. पोलिसांनी चालकाला इशारा करून गाडी थांबवली आणि अत्यंत शिताफीने गाडीतील चारही जणांना घेरून ताब्यात घेतले. यात चालक सागर दत्तू उपळकर (वय २८), विशाल रामकिसन गुंजाळ (वय २६), ऋतीक भगवान गुंजाळ (वय २५) आणि पवन गोरख उपळकर (वय २७, सर्व राहणार रामपूर, ता. श्रीरामपूर) यांचा समावेश आहे. आरोपींकडून ४० हजार रुपये किमतीचे एक गावठी पिस्तूल, ४ हजार रुपये किमतीची २ जिवंत काडतुसे, ५१ हजार ४०० रुपये किमतीचे ३ मोबाईल फोन व रोख रक्कम, तसेच गुन्ह्यात वापरलेली ५ लाख रुपये किमतीची मारुती इर्टिगा गाडी असा एकूण ५ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोकॉ रमीजराजा रफीक आत्तार यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहेत.

## संरचनात्मक वि. चक्रीयः मल्टीकॅप रणनीतीद्वारे पोर्टफोलिओवर प्रभुत्व



**आदित्य अरविंद देशपांडे**

एकदा आपण फंड निवडला की काम झाले, असे बहुतेक गुंतवणूकदार गृहीत धरून चालतात. परंतु एखाद्या मल्टीकॅप फंडामध्ये अनेक निर्णय सतत घेतले जात असतात – विशेषतः कोणत्याही वेळी प्रत्येक मार्केट कॅप श्रेणीमध्ये किती गुंतवणूक ठेवायची याबद्दल.

एखाद्या मल्टीकॅप फंडाला लार्ज, मिड आणि स्मॉल कॅप स्टॉकमध्ये प्रत्येकी किमान २५ टक्के गुंतवणूक ठेवणे आवश्यक असते. परंतु त्या सीमेपलीकडे, बाजाराची परिस्थिती आणि फंड मॅनेजरला कुठे संधी येत असल्याचे दिसते यावर अवलंबून वितरण केले जाऊ शकते. मार्केट कॅपच्या वितरणाच्या पलीकडे विविध क्षेत्रांचे मिश्रणसुद्धा महत्त्वाचे असते.

भांडवली वस्तू कंपन्यांवर जास्त भार देणाऱ्या मल्टीकॅप फंडाची वर्तणूक वित्तीय सेवा किंवा ग्राहक कंपन्यांवर जास्त भार असलेल्या फंडांपेक्षा वेगळी असेल. क्षेत्रांमधील गुंतवणूक (सेक्टर एक्सपोजर) आणि बाजार भांडवलातील कल (मार्केट कॅप टिल्ट) यांच्या मिलाफातून पोर्टफोलिओचे स्वरूप निश्चित होते.

या सक्रिय व्यवस्थापनाचा अर्थ असाही होतो, की मल्टीकॅप फंड बदलत्या परिस्थितीला प्रतिसाद देऊ शकतो. जागतिक अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदारांचा ओढा जर सुरक्षिततेकडे असेल, तर हा फंड लार्ज कॅपवरील भार वाढवू शकतो. देशांतर्गत वाढीच्या थीममध्ये जर गती येत असेल आणि मिड आणि स्मॉल कॅपमधील उत्पन्नात सुधारणा होत असेल तर हा फंड त्या सेगमेंटकडे अधिक झुकू शकतो.

अशा प्रकारे मल्टीकॅप फंडचे व्यवस्थापन सक्रियपणे केले जाते आणि केवळ मागील परतावा पाहून नव्हे तर सध्याची स्थिती आणि त्यातून व्यवस्थापकाच्या दृष्टिकोनाचे कोणते प्रतिबिंब पडते, हे समजून घेऊन त्याचे अधिक चांगले मूल्यमापन करण्यास मदत मिळू शकते

त्यानुसार, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल मल्टीकॅप फंड हा भारतातील सर्वात जुना मल्टीकॅप फंड असून तो बाजाराच्या विविध टप्प्यांमधून मार्गक्रमण करण्यासाठी, पोर्टफोलिओला स्थैर्य देण्यासाठी संरचनात्मक आणि चक्रीय चौकटींचा संयोग साधतो. या फंडाने ३० मे २०२६ पर्यंत १९.६७ टक्के (३ वर्षे), १६.५१ टक्के (५ वर्षे) आणि १५.०१ टक्के (स्थापनेपासून – ऑक्टोबर १९९४) एवढा वार्षिक चक्रवाढ परतावा दिला आहे.

## अहिल्यानगर येथील राधिका देशमुख शिष्यवृत्ती परीक्षेच्या राज्य गुणवत्ता यादीत



नगर – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी)– २०२६ मध्ये ऑक्सिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल, अहिल्यानगर येथील विद्यार्थिनी राधिका देशमुख हिने राज्याच्या गुणवत्ता यादीत १६ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

यंदा इयत्ता ५ वी करिता या परीक्षेसाठी राज्यभरातून ६ लाख ३६ हजार ५८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेत राज्यात १६ वा क्रमांक मिळवत राधिकाने आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे. विशेष म्हणजे, अहिल्यानगर जिल्ह्यातून (शहरी विभाग) राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवणारी ती एकमेव विद्यार्थी ठरली असून, तिने अहिल्यानगर जिल्ह्यात (शहरी विभाग) प्रथम क्रमांक पटकाविला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातून ३७ हजार ९५८ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग घेतला होता.

राधिकाने शिष्यवृत्ती परीक्षेतील यशासोबतच इयत्ता ५ वी मध्ये होणाऱ्या अनेक स्पर्धा परीक्षांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. राज्यस्तरीय ज्ञानोदय इंग्लिश ग्रामर टेस्ट मध्ये तिने राज्यात २ रा क्रमांक, NSE (नॅशनल स्कॉलरशिप एक्झाम) मध्ये राज्यात १५ वा क्रमांक, मंथन राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यात ३० वा क्रमांक, तर ATS (हेडगेवार) परीक्षेत अहिल्यानगर जिल्ह्यात ६ वा क्रमांक मिळविला आहे. याशिवाय गणित प्राविण्य परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यापुढील गणित प्रज्ञा परीक्षा मध्ये सिल्व्हर लिस्ट मध्ये स्थान मिळवत तिने गणित विषयातीलही आपले विशेष प्राविण्य सिद्ध केले आहे. केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर सांस्कृतिक क्षेत्रातही राधिकाने उल्लेखनीय यश मिळविले आहे. अखिल भारतीय गांधर्व कथ्थक नृत्याच्या तृतीय स्तर (प्रवेशिका पूर्ण) परीक्षेत ती विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाली आहे.

राधिका देशमुख ही अहमदनगर महाविद्यालयातील प्रा.डॉ.संतोष देशमुख आणि अर्चना देशमुख यांची कन्या आहे. तिच्या यशामागे शाळेतील शिक्षकांचे, कासवा मॅडम व तिच्या पालकांचे मार्गदर्शन व सातत्यपूर्ण प्रोत्साहन लाभले आहे.



श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ६ विद्यार्थी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत आले

## शिष्यवृत्ती परीक्षेत 'श्रीकांत गुगळे हायस्कूल'च्या सहा विद्यार्थी 'जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत'

नगर – शिशु संगोपन संस्था संचालित श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल संलग्न महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालयातील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ६ विद्यार्थी शिष्यवृत्तीसपात्र झाले असल्याची माहितीमुख्याध्यापक दत्तात्रय कसबे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) फेब्रु.२०२६ मध्ये विद्यालयातील २० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यामध्ये एकूण १७ विद्यार्थी पात्र झाले असून जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत ६ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले आहेत. त्यांना रुपये ७५०० प्रति वर्ष शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ८५ टक्के लागला असून अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात शाळानिहाय यादीमध्ये शाळा द्वितीय क्रमांकावर आहे.

शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी खालीलप्रमाणे मंडलिक ओम श्रीराम २६४, महाजन सुयोग नारायण २४२, गाडे सुयश गणेश २३६, कोल्हे श्रेयस भारत २३६, कुलंगे समर्थ संतोष २२८, शिंदे प्रत्युष प्रकाश २२६

गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सचिव र.धों. कासवा, सहसेसचिव राजेश झालानी, खजिनदार ॲड. विजय मनोत तसेच विश्वस्त, संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक दत्तात्रय कसबे व सर्व सेवकवृंद, पालक यांनी अभिनंदन केले.

## वैद्यकीय संस्था, क्लिनिकल आस्थापना विधेयकाचा पुनर्विचार न झाल्यास संघर्ष

**नियमनाला विरोध नाही, एकतर्फी नियंत्रणाला विरोध; शासनाने व्यापक चर्चा करावी**



**डॉ. धनंजय कुलकर्णी**

नगर – प्रस्तावित महाराष्ट्र वैद्यकीय संस्था, क्लिनिकल आस्थापना (क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट्स) विधेयक–२०२६ मधील अनेक तरतुदी एकतर्फी, नोकरशाहीप्रधान व प्रत्यक्ष आरोग्यसेवेच्या वास्तवाशी विसंगत असल्याने शासनाने या विधेयकाचा कलमनिहाय पुनर्विचार करावा, अन्यथा राज्यव्यापी लोकशाही मार्गाने संघर्ष उभारावा लागेल, असा इशारा इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी व सचिव डॉ. अमित करडे यांनी दिला.

आयएमएने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नियमनाला विरोध नसून एकतर्फी नियंत्रणाला विरोध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. रुग्णसुरक्षा, दर्जेदार आरोग्यसेवा व पारदर्शकतेला वैद्यकीय क्षेत्राचा पूर्ण पाठिंबा असल्याचे नमूद करत डॉक्टर व आरोग्य संस्थांना विश्वासात घेऊनच कायदा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या विधेयकामुळे ग्रामीण भागातील लहान दवाखाने, नर्सिंग होम्स व मध्यम रुग्णालयांवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. विद्यमान नोंदणीकृत रुग्णालयांना पुन्हा तात्पुरत्या नोंदणीची सक्ती करू नये, नोंदणी प्रक्रिया पारदर्शक व कालबद्ध असावी, आपत्कालीन उपचार करणाऱ्या डॉक्टरांना कायदेशीर संरक्षण मिळावे, तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रभावी कायदा करावा, अशी मागणीही आयएमएने केली आहे. आयएमएचे सर्व पदाधिकारी, सदस्य तसेच अहिल्यानगर शहरातील डॉक्टरांनी पाठिंबा दिला आहे.

## अक्षय कटारिया प्रथम प्रयत्नात सीए फायनल परीक्षेत उत्तीर्ण



नगर – इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या मे महिन्यात घेण्यात आलेल्या सीए फायनल परीक्षेचा नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात अक्षय कटारिया यांनी प्रथम प्रयत्नात यश संपादन केले आहे. वक्तशीरपणा, चिकाटी आणि अथक मेहनतीच्या बळावर त्यांनी ही कठीण परीक्षा अवघ्या २१ व्या वर्षी यशस्वीरित्या उत्तीर्ण केली.

अक्षय कटारिया यांची मे. कानकिया ॲण्ड मेहता असोसिएट्स या फर्ममध्ये सीए अभयकुमार कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली आर्टिकलशिप चालू आहे. आर्टिकलशिपच्या कालावधीत त्यांना व्यावसायिक कामकाजाचा सखोल अनुभव मिळाला, ज्याचा परीक्षेतील यशात मोलाचा वाटा ठरला.

अक्षय कटारिया यांना त्यांचे वडील सीए अभयकुमार कटारिया, आई सौ. मनीषा कटारिया, आजोबा अशोकलाल कटारिया तसेच चुलते इंजि. अमृतलाल कटारिया, डॉ. शांतीलाल कटारिया आणि मामा संतोष फिरोदिया यांचे मार्गदर्शन लाभले. परीक्षेच्या कठीण काळात संपूर्ण कुटुंबाने दिलेले पाठबळ हेच आपल्या यशामागील सर्वात मोठे बळ असल्याची भावना अक्षय कटारिया यांनी व्यक्त केली.

## अहिल्यानगर येथील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना '१०० टक्के मोफत बस प्रवास' द्यावे

**नगरसेविका सुजाताताई पडोळे यांची एस.टी. महामंडळाकडे मागणी**

नगर – अहिल्यानगर शहर आणि जिल्ह्यातील शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना एस.टी. आणि सिटी बसमधून १००% मोफत प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नगरसेविका सौ. सुजाताताई महेंद्र पडोळे यांनी एस.टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातून दररोज हजारो विद्यार्थी उच्च व माध्यमिक शिक्षणासाठी एस.टी. आणि स्थानिक सिटी बसने प्रवास करत असतात. मात्र, यातील बहुतांश विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्याने त्यांना दरमहा प्रवासाच्या खर्चाचा मोठा भार सहन करावा लागतो. अनेकदा आर्थिक टंचाईमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर याचा विपरीत परिणाम होतो आणि ते शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती निर्माण होते, याकडे सुजाताताई पडोळे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून त्यांचे शिक्षण आणि सर्वांगीण विकास ही राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक बाब आहे. त्यामुळे केवळ आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, यासाठी त्यांना बस प्रवास पूर्णपणे मोफत करणे गरजेचे असल्याचे पडोळे यांनी पत्रात म्हटले आहे. यासोबतच, अनेकदा बस प्रवासादरम्यान विद्यार्थ्यांना नाहक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे जे विद्यार्थी शालेय किंवा महाविद्यालयीन गणवेशात प्रवास करत असतील, त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित वाहक आणि कर्मचाऱ्यांना देण्यात याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सन्मानाची जपणूक करत प्रशासनाने या संवेदनशील विषयावर तातडीने आणि सकारात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली असून या निवेदनाच्या प्रती मुख्य बस स्थानक, माळीवाडा आगार प्रमुख आणि विभागीय कार्यालयालाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

## आनंदऋषीजी योगा सेंटर

**आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय**

मी गेल्या एक वर्षापासून योग करु लागलो. मला योगासाठी माझ्या बायकोकडून प्रेरणा मिळाली. ती दोन वर्षापासून जिजाऊ ग्रुप मध्ये योगासाठी जात होती. परंतु दुपारी योगास तिच्या खूप सुट्टया व्हायच्या. ज्या दिवशी तिचे खाडे व्हायचे त्या दिवशी ती मला कायम म्हणायाची की आज अंग दुखत आहे. कंटाळा आला आहे. योगामुळे तिचा खूप व्यायाम व्हायचा. त्यामुळे तिला थकवा अगर अंग जड पडण्यासारखे प्रकार कमी व्हायचे.

परंतु ती सुट्टी झाली की दुखण्याचा प्रकार होत असे. तिचा टाचेचा ही खूप प्रॉब्लेम होता. योगामुळे तिच्या टाचेचा प्रॉब्लेम बऱ्यापैकी बरा झाला. तिची टाच दुखणे खूपच कमी झाले. ती मला योगाबद्दल कायम म्हणायची तुम्ही मेहेर सरांच्या योगाला जात जा. मी तिलाच म्हणायचो मला योगाची गरज नाही. तुच जात जा.

परंतु ती मागे लागून मला सरांचे क्लासला घेऊन गेली व तिने पण सरांचा क्लास जॉईन केला व आम्ही दोघे सकाळी क्लासला जाऊ लागलो.

मी योगाला जाण्याअगोदर शेतात काम करुन किंवा प्रवास करुन आल्यानंतर मला अंगदुखी, पाठदुखी, थकवा आल्यासारखा व्हायचा. आणि मला कंटाळा यायचा. मला योगाला जाण्याअगोदर वज्रासन, धनुरासन, पद्मासन, सुर्यनमस्कार अगर पाय काटकोनात घेणे अजिबात जमत नव्हते. परंतु योगाक्लास जॉईन केल्यानंतर ४ ते ५ दिवसानंतर मला पद्मासन व वज्रासन थोड जमावयास लागले. आठ दिवसानंतर पद्मासन, योगासन, वज्रासन, धनुरासन हे सर्व आसने एकदम चांगल्या प्रकारे जमण्यास लागले. योगामुळे माझे सर्व अंग एकदम मोकळे व प्रसन्न वाटू लागले.

माझे खूपच खाडे व्हायचे. शेतीच्या कामामुळे गावी जावे लागल्यामुळे खाडे जास्त होतात. परंतु ज्या दिवशी माझे खाडे होतात त्या दिवशी मला खूप अस्वस्थ व अंग जड पडल्यासारखे वाटते.

माझे शरीर अगदी लवचिक बनले आहे. मला सूर्यनमस्कार, वज्रासन, धनुरासन, पद्मासन कितीही वेळेस व कितीही वेळ थांबण्यात मला त्रास होत नाही. व त्यामुळे अंगदुखी सारखे प्रकार अजिबात होत नाहीत.

श्री. अनिल सर रोज नवीन नवीन योगाचे प्रकार करुन संपूर्ण शरीर लवचिक होईल असे व्यायामाचे प्रकार करुन घेतात. त्यामुळे रोज नवीन धडे शिकावयास मिळतात. व अंग लवचिक होण्यास खूप मोठी मदत होते. योग केल्यामुळे दिवसभर अंग दुखणे सारखे प्रकार होत नाही. व दिवसभर आनंदी व प्रसन्न वाटते. त्यामुळे योगास खाडे करण्यास इच्छा होत नाही परंतु बाहेरगावी अगर शेती कामामुळे खाडे होतात. तरी खाडे कमीत कमी करण्याचा मी प्रयत्न करतो आहे. योगामुळे माझी पाठदुखी, अंगदुखी, कंबरदुखी सारखे प्रकार बऱ्याच पैकी कमी झाले आहेत.

त्यामुळे आपणही योगास कमी खाडे करुन आनंद घ्यावा. मी रोज योगास येत असून आपण ही रोज योग करावा. व निरोगी व प्रसन्न राहावे. व आपले शरीर वयोमानाने लवचिक व पिळदार बनवावे. योगासाठी वयाची मर्यादा नाही. योग हा आयुष्यभराचा जोडीदार आहे त्यामुळे योग दररोज करावा. बायको ही आपल्या संसाराची जोडीदार आहे व योग आपल्या प्रत्येकाचा आयुष्यभराचा जोडीदार आहे. त्यामुळे सर्वांनी योग जरुर जरुर करुन निरोगी जीवन जगावे ही नम्र विनंती.



योग ग्रुपमध्येच ट्रीप पण काढली जातात. त्यामुळे एक प्रकारचे सर्वांचे एकत्रित फिरणे व तेथे पण योगाचा प्रचार करण्यास मदत होते. त्यामुळे एक फॅमिली ग्रुप तयार झाला आहे. त्यामुळे ट्रीपचा, वाढदिवसाचा ही आनंद घेता येतो.

– **प्रकाश गांधी**, मोरचूदनगर, केडगाव

## कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूलच्या साई शेटेची शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या गुणवत्ता यादीत मानाचे स्थान**



नगर – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीमध्ये कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूल, केडगाव येथील विद्यार्थी साई संजय शेटे याने मानाचे स्थान मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

साई शेटे याने सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. या यशामागे विद्यालयातील शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन, अभ्यासातील नियमितता तसेच पालकांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन आणि सहकार्य यांचा मोठा वाटा असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

या यशाबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिस्टर दिव्या मारिया, वर्गशिक्षिका सौ. मनीषा तरटे तसेच विद्यालयातील शिक्षकांनी साईचे अभिनंदन करून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## वाळूची अवैध वाहतूक करणारा हायवा पकडला, पंधरा लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



नगर – पारनेर तालुक्यातील कर्जुले हर्या शिवारात अवैधरित्या वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या एका हायवा ट्रकवर छापा टाकून पोलिसांनी एकूण १५ लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका आरोपीला रंगेहात ताब्यात घेतले असून हायवा मालक असणारा दुसरा आरोपी फरार झाला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार विष्णू भागवत, सुनील पवार, शाहिद शेख, विशाल तनपुरे आणि चालक महादेव भांड यांचे पथक ५ जुलै रोजी रात्री पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. पेट्रोलिंगदरम्यान पथकाला माहिती मिळाली की, मांडओहोळ फाटा ते गुरेवाडी जाणाऱ्या रोडने कर्जुले हर्या गावच्या हद्दीत एका पांढऱ्या रंगाच्या हायवा ट्रक गाड्यातून वाळूची अवैध चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ मांडओहोळ फाटा ते गुरेवाडी रोडवर कर्जुले हर्या शिवारात जाऊन दबा धरून सापळा लावला. काही वेळातच गुरेवाडीकडून मांडओहोळ फाटाच्या दिशेने येत असलेला संशयास्पद पांढरा हायवा ट्रक पोलिसांनी अडवला आणि चालक नवनाथ शिवाजी काळे (वय २८ वर्षे, रा. जांभळवाडी, खडकवाडी, ता. पारनेर) याला ताब्यात घेतले.

सदर हायवा गाडी राहुल जाधव (पूर्ण नाव माहिती नाही, रा. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर) याच्या मालकीची असून आरोपी राहुल जाधव हा पोलिसांना चकवा देऊन फरार झाला आहे. पोलिसांनी कारवाईदरम्यान आरोपीच्या ताब्यातून ४० हजार रुपये किमतीची ४ ब्रास वाळू आणि १५ लाख रुपये किमतीचा टाटा कंपनीचा हायवा ट्रक असा एकूण १५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी ताब्यात घेतलेल्या आरोपीविरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पारनेर पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे.

## जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड



**अविनाश घुले**

नगर – अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक मालक संघटनेची ५ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता मार्केट यार्ड हमाल पंचायत भवन येथे अविनाश घुले यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकाऱ्यांची निवड एकमताने करण्यात आली.

अध्यक्ष म्हणून अविनाश घुले, कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील, उपाध्यक्ष दत्ता वामन, सुधाकर साळवे, नासिरख्वाजा खान, सरचिटणीस अशोक औषिकर, सहचिटणीस जुनैद लतीफ बागवान, खजिनदार गणेश आटोळे, सल्लागार कॉ. बाबा आरगडे, संघटक सोपान दळवी, संघटक किशोर कुलट.

तसेच कार्यकारणी सदस्य लक्ष्मण ढगे, गोरख खांदवे, सतीश भोंबाळ, अस्लम शेख, संतोष भिंगारदिवे, अन्वर रशीद शेख, सागर लांडे, सुनील खर्पे, अजय नाकाडे, बाळासाहेब खुडे, आशिष दांगडे, सुनील ढोले, किशोर खुडे, चेतन वैराळ, बाळासाहेब साळवे, रामदास सुतार, अकबर अमीन सय्यद यांची एकमताने निवड करण्यात आली.

